आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २९ जुलै २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -५

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 29 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-5 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


महत्त्वाची बातमी

## भीमा-कोरेगाव प्रकरणातील आरोपींना 5 वर्षांनंतर जामीन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी वर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. भीमा कोरेगाव प्रकरणातील दोन आरोपी वर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. व्हर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा हे 2018 पासून तुरुंगात आहेत आणि मुंबई उच्च न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. 2018 च्या भीमा-कोरेगाव प्रकरणात दोघांवर गंभीर आरोप आहेत. पण ते पाच वर्षांपासून कोठडीत आहेत, असं न्यायालयानं म्हटलं आहे. त्यामुळेच त्यांना जामीन मंजूर करण्यात येत आहे. आरोपी वर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा यांना अटींवर जामीन मंजूर करण्यात आला आहे. दोघांचे पासपोर्ट जप्त करण्यात येणार असून त्यांनी एनआयए अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहावे, असे सर्वोच्च न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. भीमा कोरेगाव प्रकरणाशी संबंधित एल्गार परिषद प्रकरणातील दोन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला. दोन्ही आरोपींनी जामीन अर्ज फेटाळल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. 2018 च्या भीमा कोरेगाव हिंसाचारातील आरोपी वर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा यांची जामिनावर सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. सुनावणीदरम्यान न्यायालयाने सांगितले की, आरोप गंभीर असल्याने दोन्ही आरोपी पाच वर्षांपासून कोठडीत आहेत. आता त्यांना अटीवर जामीन मंजूर करण्यात आला आहे.न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांच्या खंडपीठाने सांगितलं की, वर्नन गोन्साल्विस आणि अरुण फरेरा जामिनावर असताना ते महाराष्ट्राबाहेर जाऊ शकत नाहीत. त्यांचे पासपोर्ट पोलिसांकडे जमा करण्यात येतील. खंडपीठाने दोन्ही आरोपींना प्रत्येकी एक मोबाइल वापरण्याचे आणि या प्रकरणाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेला आपला पत्ता कळवण्याचे निर्देश दिले आहेत. पुण्यात 31 डिसेंबर 2017 रोजी पार पडलेल्या एल्गार परिषदेनंतर 1 जानेवारी 2018 रोजी भीमा-कोरेगाव येथे जमावाकडून हिंसाचार घडला होता. या हिंसाचारामध्ये एकाचा मृत्यू झाला होता तर अनेकजण जखमी झाले होते.





## चिखल तुडवत सावित्रीच्या लेकींचा प्रवास

### शिक्षणासाठी धो-धो वाहणाऱ्या नाल्यातून गाठावी लागते शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र हा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जन्म अन कर्मभूमी. महिलांसाठी हजारो वर्षापासून शिक्षणाचे बंद असलेले द्वार सावित्रीबाईनी खुले केले. त्यामुळे सर्वच क्षेत्रात महिलांनी उंच भरारी घेतली आहे. मात्र शिक्षण घेण्यासाठी आजच्या प्रगतशील महाराष्ट्रात सावित्रीच्या लेकींना पायाखाली चिखल तुडवावे लागत आहे. उद्याचे भविष्य असलेल्या या विद्यार्थीनीचा नशिबी आलेले हे भोग खुर्ची मिळवण्यासाठी कपटनीती त लिन झालेल्या नेत्यांना दिसणार काय ? हा खरा प्रश्न आहे. जिल्हातील राजुरा - गोवरी मार्गाचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. गोवरी नाल्यावरील पुल अद्यापही अपूर्ण आहे.

नागरिकांना ये - जा करण्यासाठी कुठलाही पर्यायी मार्ग नाही. नाल्यावरील रपटा पावसामुळे वाहून गेला. नागरिकांना व शाळकरी विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन धो धो वाहणाऱ्या नाल्यातून धोकादायक प्रवास करावा लागत आहे.बस सेवा बंद आहे. पायी जाण्यासाठी कुठलाही पर्यायी मार्ग नाही.गोयेगाव, माथरा येथील विद्यार्थी शिक्षणासाठी राजुरा या तालुका स्थळी येतात. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शेकडोत आहे. हे विद्यार्थी गौरी, पवनी ,कडोली येथून ये-जा करतात. या विद्यार्थ्यांचा प्रवास जीवघेणा ठरत आहे. गुडघाभर चिखल आणि कंबरभर पाण्यातून विद्यार्थी मार्ग काढीत आहेत. यातही त्यांना मोठी अडचण निर्माण झाली आहे. शेतात उभे पिक असल्याने शेतकऱ्याकडूनही ये-जा करण्यासाठी अडकाव होत आहे.शाळेत जाण्यासाठी आपल्या मुलांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे, हे बघून पालक चिंतेत आहेत. या गंभीर प्रकारकडे प्रशासनाने अद्यापही लक्ष गेलेले नाही.


आधुनिक केसरी

द्वितीय वर्धापनानिमित्त हार्दिक शुभेच्छा




शुभेच्छुक


अॅड. श्रीकांत जी. कवडे

हायकोर्ट छत्रपती संभाजी नगर

: ऑफिस :

फ्लॅट नं. २०४, अजयदीप हाऊसिंग सोसायटी,
हायकोर्ट जवळ, छत्रपती संभाजीनगर
मो. 9823923080, 7709122777



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण ही मंदिर बांधण्याची पद्धत किंवा शैली हेमाडपंत याने सुरु केली म्हणून हेमाडपंती मंदिर असे म्हटले जाते. अरे तेराव्या शतकात देवगिरीत यादव राजांचे राज्य होते. हेमाद्री पंडित किंवा हेमाडपंत हा यादवांचा प्रधान होता. तो फार बुद्धिमान होता. त्याने मंदिर बांधण्याची एक नवीन पद्धत विकसित केली. 'पिंकी, राजेश, या मंदिराची बांधणी तुम्ही पाहिली का ?' पिंकी म्हणाली, 'हो बाबा, नुसते दगडावर दगड ठेवलेले दिसतात.'


बाबा म्हणाले अगदी बरोबर, 'त्यालाच हेमाडपंती शैली म्हणतात. आजकाल बांधकामासाठी आपण जसा सिमेंटचा वापर करतो, तसाच पूर्वी चुन्याचा वापर केला जायचा. पण या अशा मंदिरांमध्ये हेमाडपंत याने असा कोणत्याच पदार्थाचा वापर केला नाही. चौकोनी, त्रिकोणी, पंचकोनी या आकारात दगडी चिरे कापून त्यांच्या खाचा किंवा खुंट्या एकमेकात घट्ट बसतील अशा आकारात कापून या मंदिरांची उभारणी केली आहे. ती इतकी मजबूत झाली आहे की अनेक शतके झाली तरी ही मंदिरे आजही टिकून आहेत. त्याशिवाय कित्येक टन वजन असलेल्या शिळा पंचवीस फुटांपेक्षाही अधिक उंचीवर नेऊन हे बांधकाम करण्यात आले आहे. केवढे विकसित तंत्रज्ञान असेल त्या मंडळींजवळ !'

'कमालच आहे ना बाबा, सिमेंट, चुना न वापरता अशा प्रकारचे बांधकाम करणे म्हणजे आपल्या पूर्वजांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.' राजेश म्हणाला. 'हो, राजेश, आणि अशी मंदिरे आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आहेत बरं का ! वेरूळचे घृष्णेश्वर मंदिर, औंढा नागनाथ येथील मंदिरे अशीच आहेत. चाळीसगावाजवळील पाटणादेवी येथे असेच शंकराचे हेमाडपंती मंदिर आहे.' पिंकी म्हणाली, 'बाबा, किती छान माहिती मिळाली या मंदिराबद्दल ! शाळेत ही माहिती सांगून मी बाईंची शाबासकी मिळवणार. शाब्बास पिंकी. आणि तुम्ही काय करणार राजे ?' बाबा राजेशकडे पाहत म्हणाले. बाबा, आपण या मंदिराचा फोटो घेतला आहे ना ! मी या मंदिराचे चित्र काढून आमच्या चित्रकलेच्या शिक्षकांना दाखवेन. माझे मित्र सुद्धा ते पाहून खुश होतील.' दॅट्स ग्रेट !' बाबा म्हणाले.

'आई, मला तुला काही विचारायचे आहे. मघाशी आपण भगवान शंकरांच्या पिंडीवर बेलाची पाने वाहिली. ती का वाहायची आणि तू काहीतरी मंत्र पुटपुटत होतीस तो पण सांग ना,' राजेश म्हणाला.



समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## वैचारिक प्रगल्भतेमुळे दृष्टिकोन बदलतो

आधुनिक केसरी

दैनंदिन जीवन जगत असताना वर्तमानांत आपण काहीतरी शोधत असतो. हा शोध नेमका कशाचा असतो ह्याचा अंदाज अनेकदा आपल्याला येत नाही. खरं तर हा शोध आनंद प्राप्तीचा असणं आवश्यक असतं. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असणं स्वाभाविक असतं. आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन आणि व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं. एकप्रकारे सकारात्मक वातावरण निर्माण होऊन आपली क्रयशक्ती वाढल्याची प्रचीती येऊ लागते. आपलं दैनंदिन काम करत असताना आपण नवीन व्यक्तीमत्वांचा परिचय करून घेण्याचं उद्दिष्ट साध्य केलं पाहिजे. नव्यानं परिचय झालेल्या व्यक्तींकडून आपण अनेक नवनवीन गोष्टी, संकल्पना शिकू शकतो. त्याचा एकूणच आपल्या वैचारिक प्रगल्भतेच्या वृद्धीच्या दृष्टीकोनातून खूप चांगला उपयोग होऊ शकतो.



आधुनिक केसरी

## मागणे केशवा | नाही दुजे ||

कसे पांग फेडू | गुरू माऊली मी ||
जन्माची या स्वामी | झालीस तू ||१||
सटवाईचा फेरा | जरी भाळी आला ||
तारी या जीवाला | गुरू माय ||२||
बोलणे ऐकणे | काळाने भक्षीले ||
परी तू रक्षिले | पामराला ||३||
भंगल्या जीवाची | माय तू प्रेरणा ||
शारदेची वीणा | झालीस तू ||४||
तुझ्या भावमुद्री | नटेश्वर दिसे ||
लोचनात वसे | ज्ञानाई तू ||५||
तुझ्या कृपे मज | लाभे इंद्रपद ||
अंतरीची साद | तुच घाली ||६||
गुरू चरणाची | घडो नित्य सेवा ||
मागणे केशवा | नाही दुजे ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

त्रिलोकेशि महादेवि नमस्तुभ्यं नमो नमः
| दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५३ || हे त्रिलोकेशी,
महादेवी, तुला वारंवार नमस्कार असो.
दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ज्ञान से तपसी तप करे, ज्ञान जपी का जाप ।
ज्ञान से करमी यज्ञ कर, ज्ञान प्रायश्चित् पाप
।।२४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/२४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञानामुळे तपस्वी कठीण परिश्रम करून लक्ष्यप्राप्ती साठी प्रयत्न करतो. ज्ञानामुळेच जपी आपल्या मंत्राचा जप करतो आणि ज्ञानामुळेच कर्मकांडी यज्ञ करतो. तसेच पापकर्म केलेली व्यक्ती प्रायश्चित्त करून पुढील जीवन पवित्र बनविण्याचा संकल्प करतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

या जन्मामध्ये जीव उगाच भ्रामक कल्पना करून आयुष्य वाया घालवतो. हा जन्म फुकट गेल्यानंतर पुढचा जन्म माणसाचाचं येईल याची खात्री नसते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

म्हणून तो दान करतो. दान केल्यास आपला संसार सुखाचा होईल. गेल्या जन्मी काही दान न केल्याने मी गरिब राहिलो असं अज्ञानी माणसाला वाटते. दान करायचे म्हणून एक जूने वस्त्र एक तांब्याचा पैसा काढतो, आणि तो विचार करतो की मी एवढं दान केलं आहे आता मला पुढच्या जन्माच्या वेळी कोटीच्या कोटी पुण्य मिळेल. तो तिर्थक्षेत्रांचा महिमा जाणतो तिथेही भरपूर प्रमाणात पुण्य मिळेल. या आशेवर राहून आलेल्या अतिथिला घासभर अन्न देतो, पैसा अडका देतो, आणि आशा करतो की पुढच्या जन्मात कोटीच्या कोटीरूपयांच्या राशी पायाशी लोळण घेतील. तेव्हा आपण ऐषोआरामात जीवन जगू. आजचा दिवस माझा नाही ना!!! मग ऊद्याच्या दिवशी मी खुप श्रीमंत असेल
अशी विनाकारण भ्रामक कल्पना तो मनात करतो *
जन्मकर्माच्या फेरीत अडकून बसतो.कर्मामध्ये माणसाची वासना गुंतून रहाते, या जन्मी जे दान देतो ते पुढच्या जन्मी अनेक पटीने मिळेल अशी जो कल्पना करतो तो अज्ञानी असतो तो बध्द म्हणून ओळखावा.

## प्रपंचातले सुख-दु:ख हे केवळ जाणिवेत

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

जे काही दिले आहे ते सर्व तपासून पाहण्यासाठीच असते व स्वःतची फसगत होऊ नये म्हणूनच आहे त्यामुळे त्यांनी स्वःत त्यांचे गुरु प.पु.श्री रामकृष्ण परामहंसांची त्यांच्या दृष्टीकोनातून चाचपणी केली ती इतकी कि प.पु. रामकृष्णांची अखेरची घटका चालू असताना स्वःत त्यांना पुन्हा सांगावे लागले कि बाबा रे मीच तो राम आणि मीच तो कृष्ण हे ऐकून मात्र स्वामी मात्र चपापले कि माझ्या मनात सध्या चाललेले हे बिनचूक ओळखतात म्हणजे आता तरी मी चिकित्सा थांबवलीच पाहिजे असे म्हणून स्वामींनी गुरुंच्या जवळ असलेल्या थुंकदाणीत साठलेला सर्व कफ एका घोटात पिऊन आपली निष्ठा सिद्ध केली म्हणून धन्य ते गुरु आणी शिष्य.अगदी थोडक्यात म्हणजे परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ति सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥

स्पष्टीकरण - हा आपला, हा परका असे म्हणून वागणुकीत पक्षपात करणे बरे नव्हे. तसे पाहिले तर सर्व जगच आपले आहे. पण तेवढी उडी सामान्य माणसांना झेपत नाही. पण सगळ्यांसाठी कष्ट करणे शक्य नसले, तरी आपले कुटुंब, आपले इष्टमित्र आणि आपले शेजारीपाजारी एवढयांच्या पुरते आपले तरी मन मोठे करायला हरकत असू नये. तुम्ही तुमचे मन मोठे केले तर तुम्हाला तुमचे कर्तव्यही आपोआप समजेल.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, २९ जुलै २०२३




संस्कृती नामशेष होत आहे ?

पान ६



व्याघ्र संवर्धनाच्या पद्धतीला अत्याधुनिकतेची गरज

पान ७

# राज्य सरकारचे शेतकरीविरोधी धोरण घातक

## माजी मंत्री आ.वडेट्टीवार : सरकारवर निशाणा साधत सभागृहाचे वेधले लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाविकास आघाडी सरकार काळात अर्थसंकल्पीय व पुरवणी मागण्यानुसार नवीन रस्ते तथा रस्ते दुरुस्ती तसेच जलसंधारण विभागाअंतर्गत सिंचन क्षमता वाढविण्या हेतू मंजूर विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळून निविदा प्रक्रिया सुरू असताना सरकार बदलताच हेतू पुरस्सरपणे सत्ताधाऱ्यांकडून स्थगिती देण्यात आली. मंजूर विकास कामांना स्थगिती देणे म्हणजे सध्याच्या सरकार कडून होत असलेले सुडाचे राजकारण असून यात सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. ही बाब महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला न शोभणारी असून स्थगिती दिलेल्या विकास कामांना तातडीने मंजुरी देण्यात यावी. अशी आक्रमक भूमिका घेत राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री, काँग्रेस नेते, शेतकरी पुत्र आ. विजय वडेट्टीवार यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधले.



महाविकास आघाडी सरकार काळात जानेवारी 2021 ते जुलै 2022 या कालावधीत अर्थसंकल्पीय व पुरवणी मागण्यानुसार नवीन रस्ते तथा रस्ते दुरुस्ती याकरिता निधीची तरतूद करण्यात आली होती. तर मंजूर विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया काढण्यात आल्या. याच दरम्यान महाविकास आघाडी सरकार सत्तेतून बाहेर जाताच युती सरकारने 26 जुलै 2022 रोजी शासन निर्णय देऊन मंजूर सर्व विकास कामांना स्थगिती दिली. या विकास कामांमध्ये ब्रह्मपुरी मतदार संघातील जलसंधारण विभागाकडे कोल्हापुरी बंधारे, तलाव दुरुस्ती, सिमेंट बंधारे याकरिता एकूण 32 कोटी रुपये व इतरही महत्त्वपूर्ण विकास कामे मंजूर करण्यात आले होते. याचा प्रचंड प्रमाणात लाभ हा शेतकऱ्यांना सिंचन क्षमता वाढवण्यासाठी होणार होत असतानाच ऐन वेळेवर स्थगिती दिल्याने कामे होऊ शकली नाहीत. तसेच शहरी भागाकरिता 1 एप्रिल 2021 रोजी मंजूर 18 कोटी रुपयांची विकास कामे यात 10 कोटी रुपयांच्या विकास कामांची निविदा होऊन कार्यारंभ आदेशही देण्यात आला होता. मात्र सत्ताधाऱ्यांकडून सूड भावनेतून याही विकास कामांना ब्रेक लावण्यात आला. जनहिताची ही कामे तातडीने पूर्ण व्हावीत याकरिता आम्हाला अखेर न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाद मागावी लागली. न्यायालयाने बाजू समजून घेत निकालही



आमच्या बाजूने दिला मात्र सत्ताधारी सरकारकडून न्यायालयाच्या आदेशाचा ही अवमान करण्यात आला असल्याचा आरोप राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री, आ. विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. जनहिताच्या या विकास कामांना ब्रेक लावणे हा चुकीचा पायंडा असून याच विकास कामांपैकी 60 ते 65 टक्के कामांवरील स्थगिती उठविण्यात आली असून यामागे बरीच गोपनीयता बाळगल्याचेही आ. वडेट्टीवार म्हणाले. तर आम्ही वेळेत विकास कामांची स्थगिती उठवण्याकरिता पोहोचू शकलो नाही. असे ते कोड्यात म्हणाले. सरकारमध्ये सत्ताधारी कायमस्वरूपी असणारच असे गृहीत धरणे फार चुकीचे असून सत्तेच्या मदमस्तीत जनसामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सध्या सरकारकडून विकास कामांना ब्रेक लावून करण्यात येत असून शेती व्यवसायासाठी सिंचन क्षमता वाढवण्या करिता मंजूर निधीला स्थगिती देणे म्हणजे शेतकऱ्यांना जगवायचं की मारायचं...? हे सरकारचं अन्यायकारक धोरण कळेनासे झाले आहे. अर्थसंकल्पीय व पुरवणी मागण्यातील मंजूर विकास कामांना अडवून धरणे हे महाराष्ट्रातील राजकीय संस्कृतीला न शोभणारे कृत्य असून राज्याच्या राजकीय इतिहासात हे प्रथमतः घडल्याची खंत आ. वडेट्टीवार यांनी व्यक्त केली.तर सरकारने जनहित जोपासून संवेदनशीलतेने स्थगिती देण्यात आलेल्या विकास कामांवरील स्थगिती उठवून त्या विकास कामांना तातडीने मंजुरी द्यावी अशी आग्रही मागणी राज्याची माजी कॅबिनेट मंत्री काँग्रेस नेते शेतकरी पुत्र आ. विजय वडेट्टीवार यांनी आपल्या आक्रमक शैलीतून सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मांडून सभागृहाचे लक्ष वेधले.



# बंजारा समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न : चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** बंजारा समाजातील प्रमुख नेते व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमावेळी आ. निलय नाईक, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर - जिल्हाध्यक्ष संजय वाघुले आदी उपस्थित होते. लखन आडे, विकास राठोड, वर्षा पाटील, छालुबाई जाधव, हिमांशु पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. श्री. बावनकुळे यांनी या सर्वांचे स्वागत केले. बंजारा समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही बावनकुळे यांनी दिली.

# शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरला ५० हजार द्या : शिवराज पा. चोळाखेकर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे याचा फटका तालुक्यातील जवळपास २० हजार हेक्टर शेतीला बसला आहे. त्यामुळे कोणत्याही पंचनाम्याच्या भानगडीत न पडता सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या अशी मागणी छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. मृग नक्षत्रात पावसाने दडी मारली होती त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या उशिरा झाल्या होत्या. वेळेवर पाऊस नसल्याने हैराण झालेला बळीराजा आता मातीत पेरलेले सोन पाण्यात वाहून, सडून जात असल्यामुळे तो अस्मानी संकटात सापडला आहे. तालुक्यातील बहुतांश शेतीक्षेत्र जलमय झाले आहे. माती वं पीक खरडून गेले आहे. सावकार, बँक, नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेऊन बी-बियाणं, खत खरेदी करून लागवड केली. मात्र अतिवृष्टीमुळे हे पीक जगण्याची



आशा धूसर झाली आहे.त्यामुळे पंचनाम्याच्या भानगडीत न पडता शासनाने धर्माबाद तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट हेक्टरी ५० हजाराची मदत द्यावी अशी मागणी छावा संघटनेने केली आहे.


या निवेदनावर छावा संघटनेचे धर्माबाद तालुका प्रमुख शिवराज पाटील चोळाखेकर,शहराध्यक्ष लक्ष्मण पा. येताळे,दिगंबर पा. चोंडीकर, सर्जेराव पा. बाभाळीकर,सोपान पा. धानोरेकर,रोहिदास पा. कारेगावकर शिवदास पा. करखेलीकर आदीच्या स्वाक्षरी आहेत.

# चंद्रपूरच्या विकासासाठी 15 कोटी रुपयांचा निधी मंजूर

## आमदार जोरगेवार यांचे प्रयत्न : विविध विकासकामांना मिळणार गती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या सततच्या



पाठपूराव्याला यश आले असून चंद्रपूर मतदार संघातील विकासासाठी नगर विकास विभागाच्या वतीने 10 तर समाज कल्याण विभागाच्या वतीने 5 असा एकून 15 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून मतदार संघातील विकासकामांना गती मिळणार आहे.

चंद्रपूर मतदार संघाच्या विकासकामांसाठी विविध विभागाअंतर्गत मोठा निधी आमदार किशोर जोरगेवार यांनी खेचून आणला आहे. या निधीतून मतदार संघातील विकास कामे प्रगतीपथावर आहे. यात 11 अभ्यासिक, व्यायमशाळा, समाज भवन यासह मुलभूत सोयी सुविधांची कामे प्राधान्याने केली जात आहे. यासोबत या कामांना अधिक गतीमान करण्यासाठी विविध विभागातून निधी मिळविण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. त्यात त्यांना यशही येत आहे.

नुकताच त्यांनी हिंग्लाज भवाणी वार्डाच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे. या निधीतुन सदर वार्डाचा कायापालट होणार आहे. येथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. तर शहराच्या प्रमुख मार्गावर प्रवेश गेटसाठीही आमदार किशोर जोरगेवार यांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे. पांदण रस्ते युक्त मतदारसंघ घडविण्याचा संकल्प त्यांनी केला असून यासाठीही मोठा निधी मिळावा म्हणून त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे.

दरम्यान त्यांनी नगर विकास विभागाच्या वतीने 10 तर समाज कल्यान विभागाच्या वतीने 5 असा 15 कोटी रुपयांचा निधी मतदार संघाच्या विकासासाठी खेचुन आणला आहे. या निधीतून साडे तिन कोटी रुपये खर्च करुन रामनगर येथे भव्य अभ्यासिका व जिमचे बांधकाम करण्यात येणार आहे. 1 कोटी रुपयातून वडगाव येथील कुणबी समाज मंदिराच्या जागेवर अभ्यासिकेचे बांधकाम करण्यात येणार आहे. शहरातील विविध ठिकाणी 11 जागेवर योगा शेडचे बांधकाम करण्यासाठी या निधीतील दिड कोटी रुपये खर्च केल्या जाणार आहे.

भिवापूर येथील रस्त्यासाठी 70 लक्ष रुपये खर्च केल्या जाणार आहे. तर 80 लक्ष रुपये खर्च करुन बालाजी वार्ड येथील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण केल्या जाणार आहे. विशेष म्हणजे पूर परिस्थिती उद्भवलेल्या राष्टवादी नगर, वृंदावन नगर आणि तुलसी नगर येथील विकासकामासाठी १ कोटी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यासह शहरातील विविध विकासकामांसाठी सदर निधीतील पैसे खर्च केल्या जाणार असून या कामांमुळे जनसुविधेत वाढ होणार आहे.


आधुनिक केसरी

द्वितीय वर्धापनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा





शुभेच्छुक

करण सिंग राजपूत

सरपंच

उपसरपंच विठ्ठल साळुंखे, ग्रामसेवक सतीश बनसोड,

ग्रुप ग्रामपंचायत झरी वडगाव तालुका खुलताबाद

# उपराष्ट्रपती भडकले

आधुनिक केसरी

गेल्या दोन आठवड्यांपासून मणिपूरमधील घटनेवर देशभरात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. गेल्या आठवड्यात सुरू झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही त्याचे पडसाद दिसून आले. अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांत अनेकदा कामकाज थांबवावे लागले. आज राज्यसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काही वेळातच दिवसभरासाठी स्थगित करावे लागले. त्यामुळे दिवसभराचे कामकाज वाया गेले आहे. यावेळी तृणमूलचे खासदार डेरेक ओब्रायन यांना सभापतींनी खडे बोल सुनावले. मणिपूरमधील घटनेवर तब्बल दोन महिन्यांनंतर संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आदल्या दिवशी पंतप्रधानांनी भूमिका मांडली. तसेच, संसदेत न बोलता माध्यमांकडे पंतप्रधानांनी आपली भूमिका व्यक्त केल्यामुळे त्यावरून विरोधक आक्रमक झाले आहेत. पंतप्रधानांनी या मुद्द्यांवर सविस्तर निवेदन करावं यासाठी विरोधकांनी चक्क पंतप्रधानांविरोधात लोकसभेत अविश्वास ठराव मांडण्याची तयारी केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभेत सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यानंतर खुद्द उपराष्ट्रपती अर्थात राज्यसभेचे पदसिद्ध सभापती जगदीप धनखर यांनी आपली नाराजी व्यक्त केली. मला आज ४७ नोटिसा आल्या आहेत. या सर्व नोटिसा मणिपूरमधील परिस्थितीवर सदस्यांच्या भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. गेल्या आठवड्याभरापासून ही परिस्थिती दिसून येत आहेत. मोठ्या संख्येने सदस्य ४७ व्या नियमाचा वापर करून हाच मुद्दा उपस्थित करत आहेत. मी २० जुलै २०२३ रोजी सभागृहाला सांगितले आहे की यावर अल्पकालीन चर्चा होईल. केंद्र सरकारनेही या चर्चेची तयारी दाखवली आहे. पण माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की आपल्या या सभागृहातील कृतींमुळे मोठ्या संख्येनं नागरिकांना प्रेरणा मिळायला हवी", असं म्हणत सभापतींनी विरोधकांच्या धोरणावर नाराजी व्यक्त केली. "दररोज जर सभागृहात तीच परिस्थिती निर्माण झाली, तर त्यातून आपल्याबद्दलचा जनतेमधला आदर कमी होईल. माझ्याकडे येणाऱ्या अर्जांमध्ये यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. मी या सभागृहाला विनंती करतो की त्यांनी पक्षीय राजकारणातून बाहेर पडून अशा पद्धतीने काम करायला हवं की या मुद्द्यावर अल्पकालीन चर्चा शक्य होऊ शकेल. याच्या परिणामांकडे बघा. प्रश्नोत्तराच्या तासाकडे अवघ्या देशाचे लक्ष लागलेले असते. त्यामुळे विरोधकांनी प्रश्नोत्तराच्या तासाची चर्चा होऊ द्यावी, असेही जगदीप धनखर यांनी नमूद केले. यावेळी तृणमूल काँग्रेसचे खा. डेरेक ओब्रायन यांनी या मुद्द्यावरून आक्रमकपणे भूमिका मांडायला सुरुवात केली. सभापती जे सांगतायत, ते आम्हाला माहिती आहे. मी नियमानुसारच बोलतोय, असे म्हणत डेरेक ओब्रायन यांनी जोरात टेबल वाजवला. ओब्रायन यांचा पवित्रा पाहून सभापती जगदीप धनखर चांगलेच संतापले. तुम्ही नीट ऐकले तर तुम्हाला मी काय सांगतोय ते कळेल. डेरेक ओब्रायन, असा ड्रामा करणं ही तुमची सवयच झाली आहे. तुम्ही प्रत्येक वेळी तेच करता. तुम्ही किमान एक करू शकता, की सभापतीपदाचा थोडा आदर राखा. तुम्ही प्रत्येक वेळी उठून ड्रामा करता. आपण हे सहन करू शकत नाही, असं म्हणत सभापती धनखर यांनी कामकाज स्थगित केले.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# जातीवाद संपला म्हणे..!

आधुनिक केसरी

जातीवाद, विषमता, अंधश्रद्धा, थोतांड या भारतीय समाजाला लागलेल्या व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या बाबी आहेत. भारतीय विकासाची शक्ती कमकुवत करण्याचे व माणसाला माणसापासून दुर ठेवण्याचे काम या जातीच्या उतरंडीने, विषमतेने केलेले आहे. जाती धर्माचा विचार न करता केवळ माणसाने माणसाप्रमाणे राहीले आणि राष्ट्रहीत जोपासले तर भारत जगात सर्वच बाबीमध्ये शक्तीशाली बनेल. कारण भारताकडे तरुणांची ताकद, नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, ज्ञान व विद्वता अशा सर्व गोष्टी आहेत की ज्या राष्ट्रहीताला अत्यंत पोषण आहे. परंतु वर्ण व्यवस्थेचे रुपांतर जातीव्यवस्थेमध्ये मध्ये करू एकाच वर्ण, जातीचे वर्चस्व कायम राहील अशीच व्यवस्था हजारो वर्षा पासुन सुरू आहे. परंतु एकाच जातीचे किंवा वर्णाचे वर्चस्व निर्माण होऊ नये म्हणून आपण लोकशाहीचा स्विकार केला.

सर्वांना समान केले आणि शासकीय पातळीवर सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. राजर्षी शाहु महाराज नेहमी म्हणायचे ज्यांनी हजारो वर्षांपासून लोकांना गुलाम बनवून विषमता व जातीव्यवस्था निर्माण केली तेच लोक भारताला स्वातंत्र्य मिळवून घेऊन स्वतः च्या हाती सत्ता केंद्रीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु कदापिही एकाच जातीच्या किंवा वर्णाच्या हाती सत्ता जाणे म्हणजे देशासाठी घातक असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः कडे लक्ष न देताही संविधान लिहण्याची जबाबदारी आल्याने सामाजिक जबाबदारी व मनामध्ये इमानदारी असल्याने कोणत्याही लहानातील लहान घटकांवर थोडाही अन्याय होणार नाही किंवा विकासापासून वा संधीपासुन दुर्लक्षित राहणार नाही याची काळजी घेऊन जगातील सर्वात प्रभावशाली संविधानाचे निर्माण केले व हजारो वर्षापासून चालत आलेली विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, हे शासकीय पातळीवर दुर केले. परंतु त्यांची खंत होती संविधान कितीही चांगले असले तरी ते राबणारे लोक योग्य नसतील तर संविधान निरर्थक ठरेल. समता, बंधुता, न्याय, व स्वातत्र्यावर आधारित संविधान हे समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य याला ज्याचा विरोध आहे त्याच लोकांच्या हाती गेले. आणि संविधानाने जरी समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य बहाल केले असले तरीही त्याचे महत्त्व, परिणाम हे जनमानसात रुजवण्याचे काम सत्ताधारी लोकांनी केलेच नाही. उलटपक्षी विषमता व जातीवाद प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रुजवण्याचे काम त्यांच्या कडून केले जाते. ही मोठी खंत आहे. भारतीय संविधान लागु होण्या अगोदर अनेक संतानी विषमता, अंधश्रद्धा व थोतांड याविषयी प्रबोधन केले. माणसाने माणसासोबत माणुसकी ने राहण्याची शिकवण देऊन जातीयता नष्ट करण्याचे उपदेश केले. परंतु आम्ही त्यांना च जातीत बंद केले. गोरा कुंभार, सावता माळी, सेवालाल महाराज, तुकाराम महाराज, नामदेव महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज अशा संतानी विषमते विरोध प्रबोधन केले. परंतु आम्ही त्यानाच जातीत बंद करून विचार स्विकारले नाही. तुकाराम महाराज यांच्या वैचारिक तालमीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे संगोपन झाले व छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य निर्माण करून जातीव्यवस्था मोडीत काढून मावळा ही ओळख करून देऊन विषमता वादी व्यवस्था तुडवून काढली. पुढे त्याच विचारधारेवर फुले शाहु आंबेडकर तयार झाले. संपूर्ण भारत हा फुले शाहु आंबेडकर यांच्या चळवळीला व त्यागाला जाणतो. परंतु विषमता वादी लोकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना मराठा, महात्मा फुले यांना माळी, व बाबासाहेब आंबेडकर यांना महार करून सोडले. म्हणजेच काय ज्यांचे संपूर्ण आयुष्य जाती नष्ट करण्यात गेले शेवटी त्यांनाच जातीत बंद केले. बर काही महाभाग तर छत्रपती शिवाजी महाराज यांना मराठ्यांचे माणतात पण शाहु महाराज यांना बौद्धांचे माणतात अशा वेळी त्यांच्या बुद्धीची किव येते. येथे महापुरुषांनाच जातीत बंद केले जाते तेथे लोक तोंड वर करून म्हणतात जातीवाद संपला आहे. आजही मागासवर्गीय राष्ट्रपती यांना मंदिरात प्रवेश मिळत नाही, छत्रपती घराण्यातील व्यक्तींना मंदीराच्या गाभाऱ्यात जाता येत नाही. आजही माणसाने अशुद्ध होणारे गोमुत्राने शुद्ध केले जाते तरीही जातीवाद संपला असत गृहीत धरायचे का ? मंदीरातील पुजारी सर्वांना होता येत नाही, मंदीरातील पैशाचा वापर सर्वांना करता येत नाही तरीही जातीयता संपली असेच म्हणायचे का ? धर्माचा व वर्णाचा माज असलेले लोक माणसाच्या अंगावर, कानात मुततात, महिलांवर बलात्कार करतात, व मुतणाऱ्याला व बलात्कार करण्यांनाचा सत्कार केला जातो, कारण ते उच्च जातीतील असतात. खालच्या जातीवर अन्याय जरी झाला तरी वरच्या जातीतील आरोपींना वाचवण्यासाठी सर्व जन एकत्र होतात, सत्ता, संपती च्या जोरावर पिडीत व्यक्तीचा आवाज व न्याय दाबला जातो. आणि काही लोक वर तोंड करून म्हणतात जातीवाद संपला आहे.



ज्यांना जातीवाद नष्ट करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले त्या शिव फुले शाहु आंबेडकरांचे नावही यांना सहन होत नाही तरीही जातीवाद संपला असे निर्लज्जपणे म्हणणायचे म्हणजे मेंदु गहाण असल्याचे लक्षण होय. छत्रपती शिवाजीराजे महाराज, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची, पुतळ्याची व नावाची विटंबना होते आणि त्यांच्या अनुयायावर अत्याचार होतात तरीही त्यांना केवळ जातीमुळे न्याय मिळत नाही तरीही जातीवाद संपला म्हणायचे का ? ज्या महामानामुळे आम्हाला सोंन्याचे दिवस आले मताधिकार, सातबारा, शिक्षण, आरक्षण, नोकरी, करण्याचे अधिकार मिळाले, थाटामाटात राहायचे, फिरण्याचे बोलण्याचे व्यवसाय करण्याचे, स्वातंत्र्य मिळाले त्या बाबासाहेब डॉ आंबेडकर यांची जयंती सहन होत नाही, त्यांचा पुतळा सहन होत नाही, त्यांचे नाव सहन होत नाही. म्हणुन जयंती साजरी करण्याऱ्यांची हत्या केली जाते. नावाच्या कमानी पाडून व लोकांवर अत्याचार करून त्यांच्या वर दबाव आणला जातो, खालच्या जातीतील लोकांना चांगले पाणी, सुखसुविधा मिळाल्याने अनेकांच्या पोटात दुखते, खालच्या जातीतील लोकांना न्यायच मिळू नाही म्हणून प्रयत्न केले जातात असे चित्र सर्वत्र असताना जातीवाद संपला असे बोलले म्हणजे केवळ वरच्या लोकांची गुलामी करणे होय. एकाच धर्मातील पण वेगवेगळ्या जातीतील तरुण तरुणींनी प्रेमविवाह केला तर ऑनर किलीग चे प्रकरण थांबता थांबेनात. मुलीने स्वतः च्या मनाने लग्न केल्याने तिचे जिवंतपणी श्राद्ध घालणारे लोक येथेच आहेत तरीही काही लोकांना जातीवाद दिसत नसेल तर हे त्यांचे माणसिक अपंगत्व आहे. एखाद्या ठिकाणी एखाद्या समुहावर जातीय द्वेषाने अन्याय अत्याचार झाला तर अन्याय करणारे चुकीचे आहेत असे केवळ शिव फुले शाहु आंबेडकर चळवळीचे लोकच बोलु शकतात बाकीच्याचे काय ? हेच नाही तर शिव फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारधारेला व अनुयायांना जाती धर्माची बंधने कधीच नसतात आणि अनेक जागृत अनुयायी ते बंधने पाळतही नाही. असे अनुयायी जेव्हा बुद्ध कींवा बाबासाहेब घरात लावतात किंवा त्यांच्या विचारावर बोलतात तेव्हा त्यांचे रक्ताचे नातेवाईक त्यांना समर्थन करत नाहीत बऱ्याच प्रसंगी ते नात्यातील ओलावा कमी करतात तरीही अस म्हणायचा जातीवाद संपला. थोडक्यात काय तर जाती केवळ आम्ही माणसामध्येच बघत नाही तर महापुषांमध्ये जाती बघतो. आणि इतर जातीतील महापुरुषांचा विचार किंवा फोटो घरात आहे म्हणून त्यांच्या कडे जाणे येणे बोलणे कमी करतो तर खरचं जातीवाद संपला आहे का ? हा महत्वाचा मुद्दा आहे. जातीवाद संपला आहे की नाही यावर बोलणे आवश्यक का आहे तर देशात सध्या जे अन्याय अत्याचार व बलात्कार यांचे गुन्हे घडत आहेत. आणि आरोपींना पाठीशी घातले जात आहे ते केवळ आणि केवळ जातीयवादी माणसिकतेमुळेच. म्हणून देशात शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि विषमतावादी सरकार असल्याने सरकारला हेच अपेक्षित आहे कारण याचा फायदा त्यांना निवडणुकांमध्ये होतो. स्वतः च्या जातीचे वर्चस्व, अंधश्रद्धा, पाखंड, थोतांड आणि सत्ता टिकवण्यासाठी जात टिकणे महत्त्वाचे आहे. म्हणून संविधानाने जरी जात, धर्म, पंथ, वर्ण,जन्म, लिंग यावरून भेद करता येत नाही अशी अट असताना ही देशात विषमता मजबूत होत असेल तर या मागे सरकारचाही हात असतो हेच सिद्ध होते. तरीही काही लोकांना वाटते आता पहिल्या सारखे कुठ काय राहीले. आता पहिल्या पेक्षाही घातक परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिले आपण किमान खर आणि स्पष्ट बोलु शकत होतो आज त्यावरही बंदी येत आहे. व वरच्या जातीतील व्यभिचारी लोकांनी चुकीचे, थोतांड, काहिही सांगितले तरी त्याला समर्थन केले तरच तो धर्माचा होतो नाहीतर विरोधक होतो. अशी परिस्थिती बघून मनात प्रश्न निर्माण होतो खरचं जातीवाद संपला म्हणे....



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

# दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांच्या अडचणी कधी दूर होणार ?

आधुनिक केसरी

आपला भारत देश स्वतंत्र होऊन एवढे वर्ष झाले पण, एकीकडे झपाट्याने विकास होताना दिसत आहे तर दुसरीकडे अर्धाही विकास झालेला दिसून येत नाही. शहरात होणारा विकास दिवसेंदिवस वाढतच आहे पण,दुर्गम भागाकडे बघितले तर मात्र तेथे राहणारे लोक कसे जीवन जगतात हे जाणून घ्यायला कदाचित फारसं कोणाकडे वेळ नाही असं म्हणायला काहीच हरकत नाही. दुर्गम भाग कोठपर्यंत दुर्गमच रहावा तिथे राहणारे लोक कोठपर्यंत अडी, अडचणींचा सामना करावे हेच सध्याच्या परिस्थितीत कळत नाही.एकदा पावसाळा सुरू झाला की, दुर्गम भागातील लोकांच्या विषयी दरवर्षी ह्या पावसाच्या पुरामुळे अनेक अडी, अडचणींचा सामना करतांना च्या बातम्या वृतपत्राच्या माध्यमातून वाचायला मिळत असतात.

मग ते गर्भवती स्त्रीयांच्या बाबतीत असो किंवा रुग्णाविषयी,तसेच काही नाल्यांवर आजही पुल बांधले दिसत नाही काही ठिकाणी बांधले दिसतात पण, उंच नसल्यामुळे त्यावर पाणी राहते,काही रस्ते अजिबात पक्के दिसत नाही, एकाच पावसाने त्या रस्त्यावर चिखलाचे सामाज्य दिसून येतात, काही रस्त्यावर मोठे,मोठे खड्डे पडलेले आहेत तर काही रस्त्याने तर माणूस पायी चालू शकत नाही तर सायकल कशी जाणार... ? काही नाल्यावर पुल नसल्यामुळे विद्यार्थाचे नुकसान तर होतेच पण,गर्भवती महिलेला प्रसुती करीता नेण्यासाठी जीव मुठीत धरून डोंग्याच्या साह्याने न्यावे लागते. या प्रकारच्या अनेक अडचणी शासनाला का म्हणून दिसत नाही... ? एकीकडे मोठे,मोठे झाडे तोडून पक्के शानदार रस्ते बनविले जाते पण,त्या तोडलेल्या झाडांमुळे फायदा नाही तर नुकसान दिसून येत आहे तापमानाचे प्रमाण वाढतांना दिसत आहेत हे सर्व कळते पण वळत नाही. आज दुर्गम भागातील लोकांच्या अडी , अडचणी, समस्या, आपत्ती दिवसेंदिवस वाढतच चाललेल्या आहेत. त्यांना प्रत्येक संकटाला समोरे जावे लागत आहे काही गावात आजपर्यंत लालपरी सुद्धा पोहोचली नाही तिच्या प्रतिक्षेत बरेच लोक वाट बघत आहेत.ते कशाप्रकारे दिवस काढतात त्यांचे त्यांनाच माहीत. म्हणुन तर "थोर संत सांगून गेले पाण्यातला मासा झोप घेतो कैसा जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे" संताचे वचन अगदी खरे ठरले आहेत जोपर्यंत माणूस त्या परिस्थितीत राहून जगत नाही तोपर्यंत खऱ्या अडचणी कशा असतात मुळात कळत नाही.



म्हणूनच दुर्गम भागाकडे, ग्रामीण भागाकडे पूर्ण लक्ष दिल्या जात नाही.जेथे सोय, सुविधा उपलब्ध आहे तिकडेच त्यांचाच विकास केला जातो.दुर्गम भागातील लोक असेही जगले, मेले, वाचले,शिकले किंवा नाही शिकले पुलाविना बुडून मेले तरीही त्यांच्याकडे लक्ष दिल्या जात नाही. जर सुविधा द्यायचेच असेल तर सर्वांना दिले पाहिजे, विकास करायचा असेल तर सर्वाचाच करायला पाहिजेत भेदभाव करू नये. कारण, दुर्गम भागातही माणसेच राहतात त्यांना हि इतरांनाप्रमाणे जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांना हि पक्या रस्त्याची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे पावसाळा सुरु झाला की, काही गावांमध्ये वीज अगदी बेपत्ता होऊन जाते तर...नेटवर्कचा पत्ता कुठे राहील. ..? काही ठिकाणी टॉवर उभारले दिसतात पण,नेटवर्क मिळत नसल्यामुळे ते उभारलेले टॉवर शोभेची वस्तू बणलेले आहेत.

त्यामुळे असे कित्येक काम त्यांचे अडून पडत असतात. उदा.एखाद्या वेळेस जर कोणी आजारी असेल आणि बाहेरगावी त्याला दवाखान्यात न्यायचे असेल तर रात्री, बेरात्री मोबाईल वरून संपर्क तरी कसे साधावे.. ? शहरात सर्वच सोयी उपलब्ध असतात चोवीस तास सुविधा असते पण,दुर्गम भागात मात्र माणसांचे जगणे एकाद्या नरकाच्या कमी नसते.म्हणून आजही शासनाच्या दुर्लक्षतेमुळे दुर्गम भागातील लोकांचा विकास पाहिजे तेवढ्या प्रमाणात होत नाही. म्हणून शासनाने एकदातरी दुर्गम भागाकडे,ग्रामीण भागात राहणाऱ्या गोर, गरीब, आदिवासी यांच्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे व त्यांचा इतरांनाप्रमाणेच विकास झाला पाहिजे अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तेव्हाच त्यांचा संघर्ष संपेल कारण तेही भारतीय नागरिक आहेत त्यांचा विसर पडायला नको.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# लायन्स क्लब अध्यक्षपदी ला.दीपाली घुगे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर:** शहरातील नामांकित लायन्स क्लब औरंगाबाद ऐंजल्स पदग्रहण समारंभ अजंठा अँमबॅसडोर येथे नुकताच थाटात संपन्न झाला.
मल्टिपल कौन्सिल सेक्रेटरी ला.पुरुषोत्तम जयपुरीया, इस्टॉलेशन ऑफिसर अध्यक्षपदी ला.दीपाली घुगे, सचिव ला.संगीता देशपांडे व कोषाध्यक्ष ला. शीला अग्रहकर यांना भारतीय विविध सणांच्या थीमवर नव्या कार्यकरणीची शपथ दिली. पी.डी.जी राजेशजी राऊत इंडक्टशन ऑफिसर यांनी 5 नवीन सदस्यांना लायन्स परिवारात सामील करून घेतले. गीतू छाबडा, रश्मी नायर, शुभा झंवर यांनी कार्यक्रमाची व्यवस्थापनेची जबाबदारी सांभाळली. वंदना ठोकळ व किरण वाधवाणी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.
ला.दीपाली घुगे यांनी नव्या वर्षात करावयाच्या विविध कार्याची रूपरेषा मांडली आणि सर्व सदस्यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. मावळते अध्यक्ष गीतू छाबडा यांनी मागील वर्षाचा अहवाल सादर केला व पुढील कार्यकारणीला शुभेच्छा दिल्या.
कार्यक्रमासाठी पी.डी.जी तनसुख झांबड, झोन चेअरपर्सन ला.विजय अग्रवाल, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी ला.शेखर तोरणेकर, डिस्ट्रिक्ट कोषाध्यक्ष ला.संजय सारडा, जी.एल.टी.ला.राहुल औसेकर, ला.संजीव गुप्ता व लायन्स क्लब औरंगाबाद ऐंजल्सचे सदस्य उपस्थित होते.

# मुसळधार पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात पूर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मुसळधार पावसामुळे जिल्ह्यात सर्वदूर पूर आल्याने जिल्ह्यातील २० मार्ग बंद आहेत. यामुळे वाहतूक खोळंबली आहे. वर्धा व इरई नदीला पूर आल्याने अनेक अंतर्गत मार्ग बंद होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे मुसळधार पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील अनेक भागांत अजूनही पाऊस सुरू आहे. चंद्रपूर शहर तथा जिल्ह्यात नदी, नाले दुथडी भरून वाहत आहेत.
वर्धा व इरई नदीला पूर आला आहे. इरई धरणाचे दोन दरवाजे उघडले आहे. त्याचा परिणाम सर्वदूर पाणीच पाणी असून जिल्ह्यातील २० मार्ग पुरामुळे बंद झाले आहेत.

यामध्ये प्रामुख्याने राजुरा -बल्लारपूर, राजूरा – सास्ती, धानोरा – भोयगाव, गौवरी कॉलनी – पोवणी, तोहोगाव – लाठी, कोरपना – कोडशी, रूपापेठ – मांडवा, जांभूळधरा – उमरहिरा, पिपरी – शेरज, पारडी – रुपापेठ, कोडशी – पिपरी, कोरपना – हातलोणी, कुसळ – कातलाबोडी – कोरपना, शेरज – हेटी, वनसडी – भोयगाव, विरूर स्टेशन – वरूर रोड, विरूर स्टेशन – सिंधी, विरूर स्टेशन – लाठी, धानोरा – सिंधी हे मार्ग पुरामुळे बंद झाले आहेत. अशीच अवस्था राहिली तर जिल्ह्यातील लहान मार्ग बंद होण्याची शक्यता आहे. गोंडपिपरी तालुक्यातील आक्सापूर ( पोंभुर्णा मार्गावर ) जवळील पुलावरून पुरवठा अधिकारी गेडाम यांची कार वाहून गेली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



# नीरेत रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन

## अमोल साबळेंच्या पंचसूत्री उपक्रमाचे विशेष कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** नीरा, ता.पुरंदर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) या पक्षाचा वर्धापन दिन आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या वाढदिवसा निमित्त समाजापयोगी दातृत्व दाखविणाऱ्या पंचसूत्री अशा अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांना शालेय साहित्य ग्रामपंचायत महिला कर्मचाऱ्यांना साडी चोळी, आश्रमातील विद्यार्थ्यांना अन्नदान,वृक्ष भेट व रुग्णांना फळे वाटप आदी पंचसूत्रीचा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संपन्न करण्यात आला.


रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष व भीम सामाजिक विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अमोल साबळे,पक्षाचे पदाधिकारी व मित्र परिवार यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या अनोख्या पंचसूत्री उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यावेळी सरपंच तेजश्री काकडे,उपसरपंच राजेश काकडे,ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सदस्य प्रमोद काकडे,संदीप धायगुडे,भारतीय बौद्ध महासभेचे दादासाहेब गायकवाड, सचिन मोरे, पवन धायगुडे, अनंता शिंदे, अनिल मेमाणे, भारतीय बौद्ध महासभा अध्यक्ष दादा गायकवाड, विजय शिंदे, उमेश चव्हाण, अजित सोनवणे, नानासाहेब हेंद्रे, किरण सोनवणे,सुभाष जेधे,सागर बागडे,साहिल शेख, एकनाथ भिसे, शितल मिसाळ,संभाजी मिसाळ महाराज, सुनिल पाटोळे,घुले पाटील, विजय धायगुडे, उमेश कदम आदीं सह इतर सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रात काम करणारी लोकं,पदाधिकारी तसेच शालेय व्यवस्थापन मुख्याध्यापक शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

अमोल साबळे दरवर्षी असा उपक्रम घेत असतात. वाढदिवसांचे औचित्य साधून असे उपक्रम करण्याची गरज असल्याचे म्हटले गेले.अमोल साबळे यांनी आभार व्यक्त करताना म्हटले की, आज जी लहान मुले दिसत आहेत. ती उद्याचे भविष्य आहे. ग्रामस्थांनी मुलांना उद्याचं भविष्य दाखविणे एक वही आणि एक पेन देणे हेच आहे. हे मला बाबासाहेबांनी शिकविले. याच धोरणातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्याचा उपक्रम घेत असतो.




महाराष्ट्र Business Katta









# संवेदनशील कवितासंग्रह 'फुटूच लागतात पंख'



संजय वि. येरणे
संपर्क क्र. ९४२१७८३५२८

आधुनिक केसरी

**डॉ. सुधीर राजाराम देवरे यांचा 'फुटूच लागतात पंख' आणि 'भंग अभंग' कवितासंग्रह म्हणजेच आशावादी जीवनाचे फलित मांडणारे वैचारिक काव्यसंग्रह होय. "एवढं जगूनही कविता उभी रहात नाही दोन पायावर..." (पृ. १४०, भंग अभंग) डॉ. देवरे हे जेष्ठ कवी आहेत. तेवढीच त्यांची अनुभव समृद्धता अनेक उन्हाळे पावसाळे बघून तावून सुलाखून निघालेले हे कविवर्य त्यांच्या काव्यातील संदर्भांवरून दिसून येते. खरे तर त्यांच्या या संग्रहांवर वैचारिक मत मांडण्याचे धाडस माझ्यासारख्या नवख्या समीक्षकाने करणे म्हणजे सूर्याला गवसणी घालण्याचे कार्य होय. याची जाणीव ठेवत मी काही त्यांच्या काव्यातील संदर्भांतील प्राप्त जाणिवा इतरांनाही समृद्धीकडे नेत, अभ्यासात्मक मार्गदर्शन मिळावे याकरता मतप्रदर्शन रूपाने मांडत आहे. मार्मिक विचार मांडीत जीवनातील विसंगती आणि साहित्यातील प्रयोजन भूमिका दर्शवणाऱ्या ह्या ओळी इथल्या वास्तव मनातील भाव नागडे करतात. डॉ. देवरे यांची लेखणी ही काही प्रसंगी गूढ आहे.**

काही कविता अगदी वारंवार वाचाव्यात तेवढ्याच त्या झिरपणाऱ्या आहेत. काही कविता अगदी वारंवार वाचाव्यात तेवढ्याच त्या झिरपणाऱ्या आहेत. कवी कविता करतो म्हणजे नेमके सभोवतालची परिस्थिती, इथले जीवनमान, इथली संघर्षमय परिस्थिती आणि एकूणच प्राणीमात्रांविषयीचे आनंदभाव, दुःखभाव यातील बेरकीपणा तो आपल्या नजरेतून टिपत असतो. (फक्त त्याला काव्यात्मक लय दिल्या जाते एवढेच.) आपल्या अंतरंगात अगदी हातोडीने घाव घालून चित्रित होणारे ते वज्रघात म्हणजेच त्यांच्या अंतरंगातून प्रसविले गेलेले काव्यार्थ होय. या कवितेतील हाच भावार्थ नेमक्या शब्दांत जीवनानुभूती देत सुगंधमय झालेला आहे, म्हणून त्यांचे समग्र साहित्य हे रसिकमान्य असल्याचे दिसून येते.

यात विशेषत्वाने 'फुटूच लागतात पंख' आणि 'भंग अभंग' कवितासंग्रहातून दीर्घ कालखंडातील निवडक कविता जेव्हा आपणांसमोर येतात तेव्हा त्यांच्या तीन तपाचा कालखंड विशद करणारी त्यांची कविता किती लौकिकास पात्र आहे हे सहज ध्यानात येईल. ही कविता समाजाचा एक वैचारिक भाव बनून समोर आलेली आहे. संस्कृती परंपरेचा विचार त्यात दडला आहे. स्वतः शोध घ्यायला लावणारी ही कविता समंजसपणाचे कारंजे तुषारागत उडवीत आनंदमय करून आत्मचिंतन करायला लावते. जी कविता आत्मचिंतन करावयास भाग पाडते, ती कविता अनादी कालखंड तुकाराम महाराजांच्या अभंगागत पुरून उरणारी असते. डॉ. देवरे यांची कविता यागत आहे असे वाटते. विविध जीवनानुभवाचे हे काव्य एक तात्विक विचारधारा प्रकट करून जाते. त्यातून मूल्यविष्कार दिसून येतो. जीवन हे जेव्हा मूल्याधिष्ठित होते तेव्हाच तर ते परिपूर्णतः ल्यालेले आहे असे आपण म्हणतो. ही कविता म्हणूनच स्पृहणीय आहे. डॉ. देवरे यांच्या कवितेवर विचार करताना एक दीर्घ समीक्षा ग्रंथही उणा पडेल एवढी त्यांची व्याप्ती असलेल्या कवितेवर लेखात्मक भाष्य करू जाता, काही प्रातिनिधिक संदर्भाद्वारे आपण समोर जाऊया. मानवांचा धीर खचू न देता आशावादी जीवनाला कवटाळत दिशा दाखवणारी ही मायाळू कविता सहजच आपली होऊन जाते. विविध अनुभूती, भाव अवस्था आणि निसर्गातील नानाविध रूप घेऊन ही कविता साकार झाली आहे.

*'माणसाला माणूस म्हटलं*
*तर स्तुती नाही. आपण*
*नेमकं उलटं करतो, माणसाला माती*
*आणि दगडाला देव्हारा देतो...'*

खरे तर या कवितेत एक झरा आहे. जो मानवाला विचार मूल्यता देऊन जाते. कवीच्या काव्यातील भाव वाचून क्षणभर माणूस विचार करीत शून्य मनाने बसत असेल तर, ती कविता अंतरंगाला स्पर्शून जाणारी आहे असे वाटते. नेमका कवितेचा आशय अगदी याच प्रकारे शब्दानुभूती देत तेवढाच मनोहारी होतो, असे दिसून येते. मनाच्या भाववस्तीतून आंतरक्रिया घडवून आणणाऱ्या अनेक कविता या दोन्ही काव्यसंग्रहांत दिसून येतात. ज्या कविता आपल्या रसिक मनाला उलगडतांना एक वेगळाच आनंद मिळतो. ही कविता मुक्तछंदात आहे, तेवढीच अभंगांच्या तालात रमणारी आहे. त्यात नवकल्पना, नवसंज्ञा, नाविन्यता, प्रयोगशीलता दिसून येते. कवीची काव्यशैली ही वेगळेपणाची छाप उमटवून जाणारी आहे. त्यांची काव्यभाषा तरल असून मनाला विचारगर्भता देणारी, आत्मानुभव देणारी, संत विचाराच्या माध्यमातून अंतरंगात भक्तीभाव डोकावत समाजानुभूती प्राप्त करावयास लावणारी, एकंदरीत सुख, समाधान, शांतताप्रिय वत्सलता, प्रेम व आराधना हे वैशिष्ट्य त्यांच्या अभंगांतून दरवळतांना दिसतात. या काव्याचे स्वरूप हे त्यांच्या अंतरंगातील वेदनेचा स्तूप असल्याचे भासते आणि म्हणूनच यातून त्यांच्या कवितेला चिरंजीवित्व प्राप्त झाले आहे. जीवनाच्या पलीकडेही आशादायी होत सकारात्मकता देणारी ही कविता होय. कवितेतील काव्यशैली आल्हाददायक रूप, तत्व देऊन जाते. या काव्यातील आशय, भाषा आणि प्रकार याचा संयोग होऊन ही शैली विकसित झाली आहे. शब्दांची निवड, रचना व नियोजन यातून आपल्याला या कवितेची शैली अभ्यासता येते. यामुळेच डॉ. देवरे यांचे हे बहारदार काव्य आहे असे उद्गार सहज निघतात. त्यांची कविता इतकी साध्या शब्दांत वर्णनात्मक होत आपल्याला अगदी शांत व विचार प्रवाहित करणारी आहे.

"शांत बसणाऱ्यांना लोक देव करून टाकतात
शांत बसतात म्हणून देव सगळ्यांना आवडतात
सगळ्यांना आवडण्यासाठी देव कोणाचं काहीच
करत नाही देव शांत बसतात" (पृ. १२९ फुटूच...)

कवी सहजच म्हणतात. "माझ्या आत्मनिष्ठ जीवन जाणिवांचा वस्तुनिष्ठ आविष्कार म्हणजेच माझी कविता होय." हे खरंच आहे.

*"कधीकाळी*
*आटलेलं*
*तळं तुडुंब भरलं*
*वठलेल्या*
*खोडाला*
आज पालव फुटलं"
(पृ.८६ फुटूच...)




कवीची काव्यशैली भेदक आहे. जी ग्रामीण जीवनाची बोलीभाषा, त्यांची अहिराणी भाषा, प्रमाण भाषा याचा संगम आहे. ही भाषा आज लुप्त होणाऱ्या अनेक शब्दांच्या अर्थांना विशद करत जाते.

खरे तर ही काव्यशैली, भाषाशैली अगदी मृदू गोडवा गात तर कधी उपहास साधत, कधी गुणग्राहकता देत तर कधी कठोरता दर्शवीत काव्यप्रतीतीची ओढ निर्माण करून जाते. या काव्यातील सौंदर्य म्हणजे विलक्षणता गुण अंगी बांधून चिंतनशीलतेने चमत्कारिकरित्या व्यक्त होणारी हळुवार सरल कविता होय. त्यांचे प्रामाणिक, पारदर्शक, आशावादी अनुभव व त्यातील वृत्तीचा पुरस्कार त्यांच्या काव्यातून होत, त्यातून वेदनेची फुंकर, नव्या जोमाने मनाची उमेद, आवेश उपकृत करत अलगद सौंदर्यांकीत होऊन जाते. भावसौंदर्य प्रत्येक कवितेत दडलेले दिसून येते. एकंदरीत या भावातून चिंतनशीलता, निसर्गातून समाजाच्या भावभावनांचा समर्थ सुंदर आविष्कार, समृद्ध विचारशीलता यातून बघावयास मिळते. डॉ. देवरेंच्या कविता खरे तर माणसाच्या तत्वज्ञानाचा आलेख आहेत. परिसरातील घटना, व्यक्ती आणि सभोताल दिसणारे चित्रण, त्यांच्या अंतर्मनात होणारी कालवाकालव म्हणजे ही कविता होय. जीवनाचे चिंतन करून विविध विषयावर काव्यरूपाने त्यांचे प्रकट होणे म्हणजेच समस्त सृष्टीतील सर्व विषयाचा आढावा प्रबोधनात्मक समोर आणणे होय. मानवतेसाठी साद घालणारी ही कविता समाजसापेक्ष होते. राजकीय उपहासावर घाव घालणारी दिसून येते. कधी धार्मिक विश्लेषणाचा आढावा मांडते तर कधी माणसाच्या शैक्षणिक प्रगल्भतेची जाणीव करायला भाग पाडते आहे. त्यांचे कवी मन खडखडीत- सदोदीत जागृत असून त्यातून अभिव्यक्त होणाऱ्या भाव भावनांमुळे भावसौंदर्य, विचारसौंदर्य, शब्दसौंदर्य, कल्पनासौंदर्य अशा विविध सौंदर्याची रसिकांना रसग्रहण करण्याची मेजवानी देऊन जाते. त्यांच्या अभंग संग्रहातून तर प्रेमाची अनुभूती, सौंदर्य साकारत नैसर्गिक प्रेरणेची उत्कटता दिसून येते. या काव्यातील सौंदर्यामुळे ही कविता आकर्षक- मोहक बनलेली आहे. म्हणून डॉ. देवरे हे सौंदर्यवादी कवी असल्याचे निक्षून मांडता येते. या कवितेचा आलेख बघू जाता डॉ. देवरे हे त्यांच्या कवितेत अनेक प्रतीके, प्रतिमा आणि

प्राक्कथांचाही समावेश करीत काव्याचा दर्जा उंचावत जातात. समाजमान्य व्यतिरिक्त प्रतिमा, प्रतिकात्मक शब्दांची योग्य सहज योजना आणि लुप्त होणाऱ्या ग्रामीण शब्दांचा साज त्यांच्या कवितेतून बघावयास मिळतो. ही कविता भावात्मक, प्रतिकात्मक, संश्लेषणात्मक, विषयांपरत्वे अलंकारात्मक होत सूक्ष्मभाव व विचारतत्व समोर मांडून जाते. प्रकृतीचा आशय घेऊन येणाऱ्या काही कविताही आपणास बघावयास मिळतात. यातून कवीचा नैसर्गिक प्रेरणांचा उदार निकोप दृष्टिकोन स्पष्ट होत जीवनातील आनंदानुभव- सृजनशीलता काव्य रसिकांस देऊन जाते. कधी कधी डॉ. देवरे पौराणिक आणि ऐतिहासिक संदर्भांसहीत योग्य दाखले अगदी सहज मांडून जातात. काही प्रमाणात म्हणींचा वापर, वाक्यप्रचार, सुभाषिते आपणास नव्याने सहज आढळून येतात. ही समग्र कविता अभ्यासवृत्ती शब्दांच्या माध्यमातून फुलारून आलेली दिसून येते. काही कवितेतील विडंबनात्मक भाव म्हणजे समाजाला चेतना देण्याचे महत्तम कार्य होय. लयबध्दता, तरलता, नाद कवितांतून दिसून येतात. सांस्कृतिक रूढी-परंपरेवर संयमित होऊन वैचारिक दृष्टिकोन प्रस्तुत करणाऱ्या कविता या दोन्ही संग्रहांतून भावतात. या कवितांतून काही शामक विद्रोहसुद्धा पेरलेला दिसून

येतो. मात्र हा विद्रोह सज्ञानातून सृजनशीलतेकडे नेणारा आहे. समर्पक विपरीत परिस्थितीचे विदारक विशाल आशय वर्णन करणारी ही कविता परिवर्तनासाठीचा एल्गारही पुकारत असताना दिसते. डॉ. देवरे यांची काही कविता संवादगर्भता ल्यालेली आहे. यातून त्यांचे भाषिक कौशल्य समोर येत कवितेच्या आशयाला बळकटी देऊन जाते. तिनात्मक संवाद गुंफणे म्हणजे कवीचे आत्मभाव स्वगत बनवून समोर येणे होय. ही कृती त्यांच्या काव्यातून सहज आढळून येते. कधीकधी ही कविता दुर्बोध होत आहे काय, असाही प्रश्न पडतो. मात्र ग्रेसांची गूढकाव्यता त्यांच्या कवितेत आढळून येत नसली तरी काही कवितेतील आशयअर्थ हा परिसरातील शाब्दिक ज्ञानाने गूढ होऊन जातो. त्यातील भाव अर्थानुकुलता साध्य करायला थोडा कालावधी जाऊ द्यावा लागतो. म्हणजेच एखाद्या प्राणीमात्राप्रमाणे रवंथ करून चगळावे, तसे रसिकांनी ही कविता वारंवार वाचनीय केल्यास गूढ भावाचा अर्थ त्यातील सौंदर्याने प्रेरित शब्दवलय सहज साकार होत मनात उलगडू लागतात. एकंदरीत हळूहळू झिरपत जाणारी ही कविता आहे.

**क्रमशः**

# संस्कृती नामशेष होत आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृती संपूर्ण जगाला आकर्षित करते, परंतु आपण भारतीय आपल्या संस्कृतीपासून दूर जात आहोत. दिवसेंदिवस आपण पाश्चिमात्य संस्कृतीचा अंगीकार करत आहोत आणि आपली संस्कृती कुठेतरी फक्त पुस्तके आणि कथांमध्ये हरवत चालली आहे. आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण करणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. त्याग, आदर, आत्मसंयम, सत्य, अहिंसा, अध्यात्म ही आपल्या संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. जिथे एकेकाळी आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटायचा तिथे आजची तरुणाई पाश्चात्य संस्कृतीकडे अधिकाधिक आकर्षित होत आहे. राहणीमान-सहिष्णुता पूर्णपणे बदलली आहे, ती आपल्या तत्त्वांपासून आणि मूल्यांपासूनही अंतर ठेवू लागली आहे.**

पाश्चात्त्य संस्कृतीमुळे आजचे तरुण आपले जीवन उद्ध्वस्त करत असल्याची टिप्पणी अलाबाद उच्च न्यायालयाने केले. सोशल मीडिया चित्रपट टीव्ही मालिका आणि दाखवल्या जाणाऱ्या वेब सिरीजच्या प्रभावाखाली देशातील तरुणांना त्यांच्या जीवनातील चांगल्या मार्गाचा शोध घेता येत नाही आणि योग्य सोबती ठरवता येत नाही तरुण चुकीच्या व्यक्तीच्या घराण्यात सापडतात असे निरीक्षण अलाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सिद्धार्थ यांनी नोंदवले. खंडपीठाने म्हटले की पाश्चात्य संस्कृतीच्या पानामुळे परिणामांची जाणीव नसलेली तरुण पिढी मुक्त नात्यांमध्ये प्रवेश करत आहे त्यानंतर जोडीदाराच्या निवडीला सामाजिक मान्यता मिळाल्यानंतर त्यांचा भ्रमनिरास होतो अशा नातेसंबंधात प्रवेश केल्यावर त्यांना त्या संकटातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग सापडत नाही. भारतीय पालक त्यांच्या मुलांना पाश्चात्य रूढी स्वीकारण्याची परवानगी द्यायची की नाही त्यांना भारतीय संस्कृतीत बांधून ठेवायचे याबद्दल संभ्रमावस्थेत आहे यामुळे काही वेळा त्यांची मुले स्वतःच्या आवडीच्या व्यक्तीशी लग्न करण्यासाठी घरातून फरार होतात घाई घाईत निर्णय घेतल्यामुळे किंवा कधीकधी त्यांच्यावर आत्महत्येची वेळ येते असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

संस्कृती दिवसेंदिवस पाश्चिमात्य संस्कृतीच्या जाळ्यात अडकत चालली आहे. अशा परिस्थितीत लोक आपली सभ्यता आणि संस्कृती विसरत आहेत. त्यामुळे भारतातील पौराणिक परंपरा हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या आंधळ्या अनुकरणात आपली संस्कृती नामशेष होत चालली आहे. आपल्याला इतिहासात ही गोष्ट शिकवली गेली आहे की जेव्हा जगातील सर्व संस्कृती आपले रानटी जीवन जगत होत्या, तेव्हा भारतात वेदांचे स्तोत्र गुंजत होते. यज्ञात महिलांचाही तेवढाच वाटा होता. आपली भारतीय संस्कृती तेव्हा पूर्णपणे अत्याधुनिक होती, मग ती अध्यात्माची असो वा आर्थिक विकासाची, भारतीय संस्कृतीचा पूर्ण विकास झालेला आहे. आर्यावर्ताला तसे सोन्याचे पक्षी म्हटले गेले नाही.

औद्योगिक क्रांती ही मानवी जीवनातील सर्वात मोठी उपलब्धी आहे. काळ हे परिवर्तनाचे नाव आहे. बदलत्या काळानुसार पाश्चात्य संस्कृतीत औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांतीमुळे मोठमोठे कारखाने आणि यंत्रे विकसित झाली. हळुहळू या उद्योगांनी आणि यंत्रांमुळे मानवी जीवन खूप सोपे झाले. परंतु, औद्योगिक क्रांतीने त्याचे इतर परिणामही आणले. या औद्योगिकदृष्ट्या विकसित देशांसमोर आर्यवर्त उभे राहू शकले नाहीत आणि परिणामी भारत राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या गुलामगिरीच्या जंजाळात अडकला.

औद्योगिक क्रांतीमुळे माणसाचे जीवन सुसह्य झालेच पण त्यासोबतच वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जलप्रदूषण आदी समस्याही विकासासोबत आल्या. बदलत्या काळानुसार भारत स्वतंत्र होताना दिसत आहे. भारत सरकारनेही औद्योगिक क्रांतीचा अवलंब करण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्याच्या चांगल्या गुणांसोबतच त्याचे वाईट परिणामही भारताला भोगावे लागले हे उघड आहे. आज एकविसाव्या शतकात वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जलप्रदूषण इत्यादी भारतासोबतच संपूर्ण जगाची समस्या बनली आहे.

वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जलप्रदूषण याच्या चुकीच्या परिणामांची जाणीव आज संपूर्ण जगाला आणि भारताला झाली आहे आणि त्यांना पूर्णपणे तोंड देण्यासाठी अनेक पावलेही उचलली जात आहेत, पण या सगळ्यात आपल्या संस्कृतीच्या सांस्कृतिक प्रदूषणाकडे कुणीच लक्ष देत नाही.पाश्चिमात्य सभ्यतेच्या लोकांपासून आपण आर्थिक आणि औद्योगिकदृष्ट्या मागासलेलो आहोत हे लक्षात येताच भारतीय लोकांनी पाश्चिमात्य सभ्यतेच्या चांगल्या गोष्टींबरोबरच त्यातील वाईट गोष्टींचाही स्वीकार केला. पाश्चिमात्य संस्कृतीतील लोकांनी पाळलेल्या प्रत्येक प्रथा आंधळेपणाने स्वीकारल्या जाऊ लागल्या.



पूर्वी भारतात समाजसुधारक, अभ्यासक, धर्मतज्ज्ञ तरुणांना मार्गदर्शन करत असत. गुरू आपल्या शिष्यांचे शिक्षण आणि दीक्षा याकडे विशेष लक्ष देत असत. एका वर्तुळात लैंगिक खेळ केला गेला. अनेक कुटीर उद्योग त्यांच्याबरोबर संस्कृती जपत होते, जसे की कठपुतळी नृत्य इ. आजही आपल्या संस्कृतीतील पौराणिक कथांवर आधारित नाटके गावा-गावात सादर केली जातात.

पण, आजची परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. भारतातील तरुण पिढी पाश्चात्य सभ्यतेचे आंधळेपणे अनुकरण करण्यात कोणतीही चूक करत नाही. तिच्या मोबाईलमध्ये इंग्रजी भाषेतील कॉलर ट्यून सेट करणे तिला तिचे मूल्य समजते. परदेशी गायक, विदेशी कपडे, विदेशी खाद्यपदार्थ, परदेशी वाहने आदी आता आदराचे प्रतीक बनले आहेत. आपली संस्कृती मरत आहे. पाश्चात्य सभ्यतेच्या चांगुलपणाचे अनुकरण करण्यात काही गैर नाही, पण अनुकरणाच्या नावाखाली वाईट गोष्टींचा अवलंब करणे कितपत योग्य वाटते? लैंगिक खेळाचे खुले प्रदर्शन इ. आपल्या समाजाच्या जडणघडणीचा अविभाज्य भाग कसा बनला आहे? भारतात व्हॅलेंटाईन डे, रोज डे, किस डे, हग डे इत्यादी प्रथा का सुरू झाल्या? सरस्वती पूजा, गुरुपर्व इत्यादी आपल्या संस्कृतीतून का लोप पावत आहेत? याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या संस्कृतीच्या सांस्कृतिक वारशात आपण स्वाभिमानाची भावना गमावून बसलो आहोत.

आजच्या तरुण पिढीसमोर भारतीय विद्वान तितके पूज्य नाहीत, जितके बाहेरचे विद्वान आपल्या नव्या तरुण पिढीसाठी आदर्श ठरत आहेत. विवेकानंदजींना अमेरिकेत नाव आणि आदर मिळाला तेव्हाच हद्द झाली, तेव्हाच त्यांना भारतात प्रसिद्धी मिळाली. योगानंद परमहंस, ओशो, स्वामी राम इत्यादींच्या बाबतीतही असेच घडले. भारताची सांस्कृतिक गुलामगिरी आणि सांस्कृतिक प्रदूषणाच्या तावडीतून अजून सुटका झालेली नाही. भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला असला तरी सांस्कृतिकदृष्ट्या स्वातंत्र्य मिळवणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

सांस्कृतिक प्रदूषण दूर केल्याशिवाय आपले सांस्कृतिक स्वातंत्र्य मिळणार नाही. त्याची सुरुवात शाळा आणि विद्यापीठांपासून करायला हवी. आपल्या तरुण पिढीमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल आणि इतिहासाबद्दल आदराची भावना निर्माण झाली, तरच या देशाला सांस्कृतिक प्रदूषणाच्या वाईट परिणामांपासून वाचवता येईल. यासाठी भारत सरकारने शिक्षण व्यवस्थेत आवश्यक ते बदल करणे आणि शिक्षकांचे पूर्ण सहकार्य घेणे अत्यंत गरजेचे आहे, तरच भारत आजही सोन्याचा पक्षी आहे असे म्हणता येईल.

# व्याघ्र संवर्धनाच्या पद्धतीला अत्याधुनिकतेची गरज



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**निसर्गाच्या अन्नसाखळीत वाघांना महत्त्वाचे स्थान आहे. याशिवाय भारतीय उपखंडातील वाघांनाही स्वतःचा पौराणिक आधार आहे. त्यामुळेच येथील वाघांची वाढती लोकसंख्या ही आनंदाची बाब आहे. अखिल भारतीय व्याघ्र अंदाजाच्या चौथ्या चक्राच्या आकडेवारीनुसार, 2006 मध्ये भारतात वाघांची संख्या 1,411 आणि 2014 मध्ये 2,226 होती जी 2018 मध्ये वाढून 2,967 झाली. म्हणजेच 2014 ते 2018 या काळात भारतातील वाघांची संख्या तेहतीस टक्क्यांनी वाढली आहे. 2010 च्या सेंट पीटर्सबर्ग घोषणेनुसार 2022 पर्यंत वाघांची संख्या दुप्पट करण्याचे लक्ष्य भारताने नियोजित वेळेच्या अगोदर यशस्वीरित्या गाठले आहे.**

भारतातील वाघांच्या सद्यस्थितीबाबत एक अहवाल 9 एप्रिल 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकातील म्हैसूर येथे प्रकाशित केला. यानुसार भारतात 2018 च्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार 2967 वर असलेली वाघांची संख्या 3167 वर पोहोचल्याचे जाहीर करण्यात आले. खरे तर ही वाढ नेत्रदीपक किंवा खूप लक्षणीय नाही

आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास जगातील एकूण वाघांची संख्यां पैकी सत्तर टक्के वाघ एकट्या भारतात आहे. वाघांच्या संख्येत झालेली ही वाढ खरं तर भारताच्या दूरदर्शी संवर्धन पद्धती, प्रोजेक्ट टायगरचे यश आणि जीपीएससह इतर तांत्रिक उपाय, वन्यजीव संरक्षणातील विशेष यशाकडे निर्देश करते. जीपीएस आणि इतर तांत्रिक उपकरणांच्या वापरामुळे वाघांच्या गणनेला हातभार लागला आहेच, शिवाय वन्यप्राण्यांच्या वर्तनाची अनेक छुपी रहस्येही उलगडली आहेत. जीपीएस तंत्रज्ञानामुळे वाघांच्या शिकारीवरही अंकुश आला आहे.

1972 च्या वन्यजीव ( संरक्षण ) कायद्याच्या अंमलबजावणीनंतर 1 एप्रिल 1973 रोजी जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, उत्तराखंडमध्ये 'प्रोजेक्ट टायगर' द्वारे भारतात व्याघ्र संवर्धनाची सुरुवात झाली. सांख्यिकी आकडेवारी असे दर्शविते की वसाहती काळात, ब्रिटिश अधिकारी आणि भारतीय राजांनी वाघांची अंदाधुंद शिकार केल्यामुळे, त्यांची संख्या खूपच कमी झाली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत भारतात सुमारे चाळीस ते पंचेचाळीस हजार वाघ होते, जे 1960 आणि 1970 च्या दशकापर्यंत फक्त दोन हजारांच्या आसपास उरले होते. वाघांचे अधिवास नष्ट होण्याची मुख्य कारणे ओळखून ते नियंत्रित करणे आणि वैज्ञानिक, पर्यावरणीय, आर्थिक आणि सांस्कृतिक मूल्यांसाठी वाघांची व्यवहार्य लोकसंख्या सुनिश्चित करणे हे प्रोजेक्ट टायगरचे मुख्य उद्दिष्ट होते. या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात भारतात फक्त नऊ वाघांची अभयारण्ये होती, परंतु आज त्यांची संख्या तेहतीस आहे, यावरून व्याघ्र संवर्धनाला आमचे प्राधान्य दिसून येते.

या प्रकल्पाचे प्रशासकीय नाव 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण' असे आहे, ज्याची स्थापना 2005 मध्ये टायगर वर्किंग ग्रुपच्या शिफारशीवरून करण्यात आली होती. वन्यजीव ( संरक्षण ) कायदा, 1972 मध्ये सुधारणा केल्यानंतर 2006 मध्ये या संवर्धन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. या युनिट अंतर्गत आठ संवर्धन विभाग कार्यरत आहेत, ज्यामध्ये सुंदरबन, काझीरंगा, सरिस्का, मध्य-भारत संरक्षण विभाग, उत्तर-पूर्व संवर्धन विभाग इत्यादी प्रमुख आहेत. या संरक्षित क्षेत्रांची निर्मिती आणि कार्यप्रणाली 'कोर/बफर' धोरणावर आधारित आहे, ज्यामध्ये प्रमुख क्षेत्राला राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्याचा कायदेशीर दर्जा देखील आहे, तर बफर क्षेत्र जंगलांसह परिघातील क्षेत्रांचा संदर्भ देते.यात जंगले आणि त्याच्या बाहेरील काही भागाचा समावेश आहे.अलीकडच्या काळात भारतात मानव आणि वाघ संघर्षाचे प्रमाण वाढले आहे, ज्याची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे जंगलांची अंदाधुंद जंगलतोड आणि वाघांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होणे. मात्र, वाघ एका जंगलातून दुसऱ्या जंगलात जाताना मानवी वस्तीपर्यंत पोहोचणेही स्वाभाविक आहे, त्यामुळे संघर्ष चव्हाट्यावर येत आहे. आकडेवारी दर्शवते की भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या फक्त पाच टक्के क्षेत्र संरक्षित आहे, जे वन्यजीवांसाठी, विशेषतः वाघांसाठी पुरेसे नाही.

वाघांना त्यांच्या अधिवासात किमान पन्नास ते शंभर चौरस किमी क्षेत्रफळ आवश्यक असते , जे बहुतेक ठिकाणी उपलब्ध नाही. वन्यजीव तज्ज्ञांच्या आकडेवारीनुसार, भारतातील एकूण वाघांच्या संख्येपैकी 29 टक्के वाघ संरक्षित क्षेत्राबाहेर आहेत, त्यामुळे मानव-वाघ संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. त्यामुळे ज्या प्रमाणात वाघांच्या संख्येत वाढ होणे अपेक्षित होते ते झालेले दिसत नाही. म्हणूनच या अहवालाच्या प्रगतीवर डॉ. उल्लास कारंथ यांच्यासारख्या शास्त्रज्ञाने टीका केलेली आहे. याशिवाय वनसंपत्तीचे अंदाधुंद शोषण, जंगलातील सिंचन, महामार्ग आणि रेल्वे प्रकल्पांचा विकास वाघ आणि इतर वन्य प्राण्यांसाठी धोकादायक ठरत आहे. भारतात वाघांची संख्या वाढली असली तरी त्याचवेळी काही वर्षांत त्यांच्या अनपेक्षित मृत्यूनेही चिंता वाढवली आहे. आकडेवारीनुसार, वाघांनी त्यांचा 97 टक्के अधिवास गमावला आहे. वाघांची शिकार हा देखील त्यांच्या मृत्यूचा एक महत्त्वाचा घटक ठरत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर, दक्षिण कोरिया, तैवान, ग्रेट ब्रिटन, जपान आणि चीनसारख्या देशांमध्ये वाघांच्या कातड्याचा आणि त्याच्या भागांचा मोठा काळा बाजार आहे. हवामान बदलाची समस्याही वाघांसाठी घातक ठरू शकते.



वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत, परिणामी समुद्राची पातळी वाढत आहे. असेच सुरू राहिल्यास भारत आणि बांगलादेशातील गंगा डेल्टा प्रदेशात राहणाऱ्या 'रॉयल बेंगाल टायगर'च्या संपूर्ण प्रजाती येथे नामशेष होतील. वाघ हे प्रामुख्याने वन्य प्राणी आहेत, जे कृत्रिम वातावरणात राहू शकत नाहीत. भारतीय प्राणीसंग्रहालय आणि वन्यजीव पशुवैद्यकांच्या असोसिएशनच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की भारतातील प्राणीसंग्रहालयांमध्ये दरवर्षी किमान वीस वाघांचा मृत्यू होतो.या आकडेवारीनुसार, 2015-16 पर्यंत भारतातील प्राणीसंग्रहालयात 245 वाघ होते, तर 99 पांढरे वाघ म्हणजेच एकूण 344 वाघ संग्रहालयात कैद होते. भारतातील वाघांच्या आजच्या आकडेवारीशी याची तुलना केली, तर भारतातील एकूण वाघांपैकी 11.59 टक्के वाघ एकट्या प्राणीसंग्रहालयात कैद आहेत. यासोबतच वाघांना आजारांचाही मोठा धोका असतो. कुत्र्यांकडून पसरणाऱ्या 'कॅनाइन डिस्टेंपर व्हायरस'मुळे संपूर्ण मांजर प्रजाती धोक्यात आली आहे. आकडेवारी दर्शवते की गुजरातच्या गिर राष्ट्रीय उद्यानात 2018 मध्ये कॅनाइन डिस्टेंपर विषाणूमुळे एकूण तेवीस सिंहांचा मृत्यू झाला. हा विषाणू धोकादायक देखील आहे कारण यावर अद्याप कोणतीही लस तयार करण्यात आलेली नाही. त्यामुळे अजून तरी या आजारावर कोणताही इलाज उपलब्ध नाही.

2010 मध्ये झालेल्या सेंट पीटर्सबर्ग घोषणेनंतर दरवर्षी साजरा होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त काही ठराव घेणे आवश्यक आहे. जीवाश्म आधारित संशोधन असे सूचित करते की वाघ या पृथ्वीवर किमान एकोणीस लाख वर्षांपासून राहत आहेत. वाघांच्या नऊ प्रजातींपैकी तीन नामशेष झाल्या असून उर्वरित सहा धोक्यात आल्या आहेत. त्यांच्या संवर्धनाबाबत आपण हलगर्जीपणा दाखवला तर या उर्वरित सहा प्रजातीही नामशेष होतील. आम्हाला अजूनही व्याघ्र संवर्धनाची पद्धत अधिक अत्याधुनिक करण्याची गरज आहे.त्यांची शिकार रोखण्यासाठी कठोर कायदे करायला हवेत आणि त्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचाही योग्य वापर करायला हवा, तरच खऱ्या अर्थाने आपला वारसा आणि निसर्ग आपण वाचवू शकू. उल्लेखनीय आहे की, वाघांच्या भारत टाइगर रेंजच्या तेरा देशांमध्ये समाविष्ट आहे, जेथे वाघ आढळतात. अशा परिस्थितीत केवळ वाघच नाही तर कोणत्याही प्राण्यावर येणारं संकट पर्यावरण आणि त्याच्या नैसर्गिक चक्रासाठी घातक ठरू शकतो. तथापि, वाघांच्या संवर्धनासाठी आपण दृढनिश्चयवादाचे घटक आत्मसात केले पाहिजेत.

# आवड नेहमीच मतलबाभोवती फिरत असते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आवडीचा भाव टिकण्याचा कालावधी ठरवतो आणि आवडीचा कार्यकारण भाव हा आवड का निर्माण झाली आहे याच मुळ ठरवतो . ज्या पद्धतीने कार्यकारण भाव असेल तितकेच दिवस हि आवड कायम राहिल अथवा टिकेल .कोणाताही प्रकारचा स्वार्थ लाभ,मतलब नसेल तरी देखील आवड निर्माण झाली तर हि आवड तहयात चिरकाल टिकणारी असते .याला शाश्वत सत्य आणि ज्ञान सद्दश्य आवड म्हणायला हरकत नाही. पण विद्यमान स्थितीत हिच आवड कालबाह्य होऊन लाभाअंती आवड या क्षणिक संसारातीलआवडीचा बोलबाला सर्वच क्षेत्रात सुसाट आहे. क्षणभंगुर जीवनात कोणीही कोणाचा खासमखास अथवा प्रिय , अप्रिय नसतो .वेळ काळ परस्थिती मतलब या मुळे प्रियत्व खासत्व आणि अप्रियत्व निर्माण होत ज्याच वास्तव दर्शन योग्य वेळी जीवनात प्रत्येकाला घडत पण वळत नसल्याने ते कळत नाही.**

म्हणून आवडीच्या माध्यमातून जीवनात निर्माण होणारे सगळे स्नेह बंध हे शेवटी येऊन मतलबाच्या महासागरात मिळतात.जितका वेळ मतलब आहे तितकाच वेळ तो स्नेह जीवंत अथवा अस्तित्वात असतो .मतलब संपला स्नेह बंध संपला.हे वास्तव आहे मग त्या स्नेह बंधातील पात्र कोणीही असु द्या. अंतिमतः अभिनय तो पर्यंतच आहे जोपर्यंत मतलब जीवंत आहे . अथवा हित होईल हि अपेक्षा सजीव आहे .मतलब संपला आवड जिव्हाळा संपला हे अगदी खुल वास्तव आहे .जिव्हाळा ,आवड, गोडी हि सहजासहजी आपल्या मनात कोणाविषयी हि निर्माण होत नाही. मग संबंधित व्यक्ती हि परिचित अपरचित पैकी कोणत्याही स्नेह बंधातील असो अथवा नसो आवड हि शेवटी मतलबावर येऊनच स्थिर होते .परमार्थात निस्वार्थ निरपेक्ष भाव हाच आवडीचा निकष असतो.पण या उलट संसारात मात्र आवड हि मतलबा भोवती फिरत असते .आपण कोणाच्या आवडीचे अथवा आपल्या कोण आवडीचा याचा मुख्य निकष काय याचा आपण स्वतःच सखोल विचार करून सुयोग्य पद्धतीने ज्ञान सदृश्य पाहिलं तर आपल्या आवडीनुसार मतलबा हाच केंद्रबिंदू निश्चित होतो.मानवी जीवनात स्नेह बंधाचा जन्म हा मतलबातुनच होत असतो .संसारीक जीवनातील आवडीचा संबंध हा खासकरून मतलबाशी निगडित असतोच . हे अगदी त्रिकाल बाधित सत्य आहे पण हे कटु सत्य कोणीही सहजासहजी मान्य करणार नाही अथवा स्वीकारणार नाही.सत्य स्वीकारणं अथवा मान्य करणं हे मानवी स्वभावाच्या विपरीत असल्याने ते पचत नाही. पण सत्य जाणल तर आवड हि मतलबा भोवती फिरत असतेच.आवड म्हणजे आकर्षण गोडी जी नेहमीच मतलबा भोवती फिरत असते .वास्तविक पाहिलं तर आवड हि विना मतलब असली पाहिजे. विना मतलब आवड गोडी परमार्थात असल्याने फार करून कोणालाही परमार्थात फार रूची नाही .संसारात मतबल हिच आवड असल्याकारणाने माणसांच महत्व हे मतलबानुसार ठरत असतं.जितका मतलब मोठा तितकंच महत्त्व तितकीच आवड जितका मतलब छोटा तितकीच आवड देखिल छोटी ठरते .आपण कोणासाठी किती महत्वपूर्ण आहेत अथवा आपल्यासाठी कोण किती महत्वपूर्ण आहे हे मतलबानुसार ठरत असतं पण विना मतलब जर कोणाच्या लेखी आपल्या विषयी आवड असेल तर हिच खरी आणि निस्वार्थ आवड असते श्रद्धा आणि निष्ठा हि निरपेक्ष भाव ठेवून असली पाहिजे आणि हिच अस्था निरपेक्ष असते प्रमाणिक असते .निष्ठा हि मतलबा नुसार ठरते जसा मतलब तशी निष्ठा असते .पण लाभा शिवाय निष्ठा नसते . आपल्याला वरकरणी दिसतं तसं नसतं विना मतलब आवड हि जवळपास दुर्लभ असते. अपवादात्मक परिस्थितीत विना मतलब आकर्षण आवड असते. संसार म्हटल कि मोह, माया , स्वार्थ,आलाच, जीवनात आपला कळत नकळत अनेकांशी संपर्क येत असते.आपले इतरांशी अथवा इतरांचे आपल्याशी निर्माण होणारे स्नेह बंध हे जेव्हा घनिष्ठ अथवा अंत्यंत जवळचे निर्माण होतात असतात पण जेव्हा आपण त्या स्नेह बंध आवडीच मुळ शोधतो त्या वेळी मतलब हाच मुख्य घटक आवडीच्या केंद्रस्थानी असतो. स्वार्थ मोह ,माया हा संसाराचा पाया असल्याने हित जोपासण्यासाठी अथवा हितसंबंधासाठी माणुस आपले स्नेह बंध जोडतो तोडतो , अथवा हितसंबंध मजबूत कमकुवत हे वेळेनुसार करत असतो .वेळ जशी आहे तसे संबंध निर्माण होतात अथवा लोप पावतात. पण वास्तविक ज्ञान सत्य हाच आवडीचा आधार असेल तर हिच आवड शाश्वत तहयात टिकणारी ठरते. पण ही आवड साध्य दुर्लभ आहे.






मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# लायन्स इंटरनॅशनलचा 'सूर्योदय', भव्य शपथग्रहण सोहळा एमजीएममध्ये होणार

## माजी आंतरराष्ट्रीय संचालक ला. संजय खेतान यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स इंटरनॅशनलचे प्रांत ३२३४ एच २ यावर्षी 'सूर्योदय' या संकल्पनेवर आधारित प्रांतीय कॅबिनेट ऑफिसर शपथग्रहण सोहळा एमजीएम परिसरातील रुखमिनी सभागृहात ३० जुलै रविवारी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यासाठी माजी आंतरराष्ट्रीय संचालक ला. संजय खेतान आणि प्रांतपाल ला. सुनील देसरडा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती सोहळ्याचे संयोजक ला. अनिल मुनोत आणि सहसंयोजक ला.राजेंद्र माहेश्वरी यांनी हॉटेल द वन येथे आयोजित पत्रकार परिषदेत २७ जुलै गुरूवारी दिली. यावेळी प्रांतपालला सुनिल देसरडा, रिजन चेअरमन ला. सुनिल ढोले, ला गरेर कुलकर्णी, प्रांतपाल सचिव शेखर तोरणेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रांतपाल ला. सुनिल देसरडा यांनी २०२३-२४ च्या उपक्रमाबद्दल माहिती देतांना सांगितले की, यावर्षी बी अ लिजंड या संकल्पनेवर आधारित दत्तक योजना, स्थायी प्रकल्प आणि महिला सबलीकरण या तीन प्रमुख बाबींवर काम करण्याचे आवाहन केले आहे. पहिल्या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक क्लबला किमान एक किंवा जास्तीत जास्त दोन संस्था दत्तक घेऊन विकसित करावयाच्या आहेत. यामध्ये यामध्ये ग्रामीण अथवा शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय प्राथमिक शाळा, वृद्धाश्रम, दिव्यांग आश्रम आणि गोशाळांचा समावेश आहे. दुसऱ्या उपक्रमाअंतर्गत त्याचप्रमाणे स्थायी अर्थात पर्मनंट प्रोजेक्ट अंतर्गत क्लिनिक, डोळ्यांचा दवाखाना, डायग्नोस्टिक सेंटर, स्किल डेव्हलपमेंट सेंटर, ऑर्थो इक्विपमेंट बैंक, कार्डियाक ॲम्ब्युलन्स, कम्युनिटी किचन, शाळा, डायलिसिस सेंटर, लायन्स कम्युनिटी सेंटर आणि लायन्स चिल्ड्रन्स पार्क यांची स्थापना करणे. त्याचप्रमाणे नाविन्यपूर्ण पद्धतीने लायन्स एक्स्पो, लायन्स बिझनेस नेटवर्क, लायन्स कॉल सेंटर, सोलार पॉवर, कलाकारांना प्रोत्साहन देणे, बायसिकल बैंक, स्पोर्ट ॲक्टिविटी आणि शाळांमध्ये रोबोटिक लॅब स्थापन करणे यांसारखे सेवा प्रकल्पही घेता येतील. त्याचप्रमाणे पर्यावरण बचावासाठी ई वेस्ट मॅनेजमेंट, शासकीय आस्थापनेत मियावाकी डेन्स फॉरेस्ट उभारणे आणि वृक्षरोपण यांसारखे प्रकल्प घेणे अपेक्षित आहे.
सर्वात महत्त्वाचे म्हणजे महिला सबळीकरणाच्या दृष्टीने स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम, लीगल राईट्स, स्पोर्ट आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित करणे सामाजिक आयुष्यात महिलांमधील नेतृत्त्वगुणांना प्रोत्साहित करणे, त्यांना डिजिटल माध्यमांचे प्रशिक्षण देणे, त्यांच्यासाठी उपयोगी असलेल्या कार्यशाळा आयोजित करणे अपेक्षित असणार आहे. त्यामुळे दत्तक योजना, स्थायी प्रकल्प आणि महिला सबलीकरण या तिन्ही बाबींवर येत्या वर्षभरात चांगली कामे होतील, असा विश्वास प्रांतपाल ला. सुनिल देसरडा यांनी व्यक्त केला.
ला. अनिल मुनोत म्हणाले की, या सोहळ्यासाठी प्रांतातील १६ जिल्ह्यातील विविध लायन्स क्लबचे सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी साडे आठ वाजता नोंदणी, साडे नऊ ते दहा वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम, सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत शपथग्रहण सोहळा दुपारी तीन ते साडे पाच दरम्यान कॅबिनेट ऑफिसरची पहिली बैठक, त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यानंतर या सोहळ्याची सांगता होईल.

या कार्यक्रमाला माजी आंतरराष्ट्रीय संचालक तथा द लायनचे संपादक ला डॉ. नवल मालू केंद्रीय मंत्री ला. डॉ. भागवत कराड, ला. राजेंद्र दर्डा, ला. महावीर पाटणी, प्रसिद्ध अभिनेत्री निशिगंधा वाड, ला श्रवण कुमार, मावळते प्रांतपाल ला पुरुषोत्तम जयपुरिया, ला राजशेखर कापसे, प्रांतपाल ला. भोजराज निंबाळकर, ला विजय भंडारी, ला बलबीर सिंग विज यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**यांचा होणार शपथग्रहण सोहळा :** प्रांतपाल ला. सुनील देसरडा यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम उप प्रांतपाल गिरीश सिसोदिया, द्वितीय उप प्रांतपाल आश्विन बजोरिया, प्रांत सचिव ला. शेखर तोरणेकर, प्रांत कोषाध्यक्ष ला संजय सारडा, लियो प्रांत अध्यक्ष नीरज गुप्ता, लियो प्रांत सचिव पूजा भारुका, लियो प्रांत कोषाध्यक्ष प्रणव जैन यांचा शपथग्रहण सोहळा संपन्न होणार आहे. अशी माहिती प्रसिध्दी प्रमुख ला. डॉ. सतिष सुराणा व ला. अभिजीत हिरप यांनी दिली.

# बोधेगाव सरपंचपदी शीतल राजपूत बिनविरोध

## माजी सरपंचांविरुद्ध दाखल झाला होता अविश्वास ठराव

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील बोधेगाव बुद्रुक येथिल नवनियुक्त सरपंच म्हणून शीतल किरण राजपूत यांची गुरुवार (दि.19) रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. माजी सरपंचावर अविश्वास ठराव दाखल झाल्याने त्यांचे सरपंच पद गमावले गेले होते. यामुळे सरपंच पदाची नव्याने निवड करण्यात आली आहे.

बोधेगाव बुद्रुक येथिल सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीत ओबीसी महिला सरपंच पद आरक्षित होते या निवडणुकीत दोन ओबीसी महिला उमेदवार निवडून आल्या होत्या त्यापैकी सुमन काशिनाथ ढेपले ह्या सरपंच झाल्या होत्या परंतु गेल्या महिन्यात त्यांच्या विरोधात जात सर्व सदस्यांनी त्यांच्यावर अविश्वास ठराव दाखल केल्याने सरपंच पद गमवावे लागले होते. त्यावेळी सर्व सद्स्य माजी सरपंचाच्या विरोधात होते. यानंतर सरपंच निवडीसाठी ( दि. 18 जुलै ) तारीख मिळाली परंतु यात पाच सदस्य गैरहजर असल्याने दि. 18 जुलैची रोजीची सभा गणपूर्ती अभावी तहकूब करण्यात आली होती. यांनतर सरपंच निवडीची सभा 19 जुलै रोजी बोधेगाव येथिल ग्रा पं कार्यालयाच्या सभागृहात दुपारी 2 वाजता अध्यासी अधिकारी तथा नायब तहसीलदार फुलंब्री संजीव किसनराव राऊत यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली. सर्व प्रथम उपस्थितांच्या नावासमोर स्वाक्षरी घेण्यात आली. यात नऊ पैकी चार सद्स्य उपस्थित होते. शीतल किरण राजपूत यांनी सरपंच पदासाठी दि. 18 जुलै रोजी एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. त्यांचे ( ना. म. प्र. स्त्री ) राखीव प्रमाणपत्र सोबत जोडले असल्यामुळे मुंबई ग्रा. पं. अधिनियम -1954, 10 ( 1 ) नुसार सरपंच पदासाठी बिनविरोध झाल्याचे अध्याशी अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी घोषित केले. यावेळी तलाठी जयश्री तायडे यांनी सहकार्य केले. सभेचे सचिव तथा ग्रामसेवक विकास जरारे यांनी अध्यासी अधिकारी यांच्या परवानगीने नवनिर्वाचित सरपंचाचे निवडीचे स्वागत करीत आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सद्स्य व माजी सरपंच राजेंद्र चोखाजी वाघ, अंकुशराव रामचंद्र कुंटे, नंदाबाई संजय वाघ हे उपस्थित होते तर अन्य पाच सद्स्य हे गैरहजर होते. शितल राजपुत यांचे महाराष्ट्र पत्रकार जनसेवा संघातर्फे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब काळे यांचे अभिनंदन केले आहे.

# जिजाऊ ब्रिग्रेडकडून मणिपूर घटनेचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज




**परतूर :** देशातील मणिपूर राज्य जळत आहे, अन्याय अत्याचार होत आहे आणि एका निवृत्त सैनिकांच्या पत्नीची विवस्त्र धिंड काढली जाते हे सर्व देशाची मान शरमेने खाली घालायला लावणारा प्रकार आहे. जो सैनिक देशाची कारगिल युद्धात सुरक्षा करतो त्याच जवानाच्या पत्नीवर अन्याय होणे हा प्रकार दुर्दैवी आहे. अनेक महिलांवर सातत्याने अत्याचार होत आहे. स्त्री हे देशाचे भाग्य आहे आणि महिलांवर होणारा अन्याय हे देशाचे दुर्भाग्य आहे. देशाच्या प्रतिष्ठेसाठी आणि भवितव्यासाठी हे तात्काळ थांबवले पाहिजे, जिजाऊ ब्रिगेड परतूरच्या वतीने आम्ही आपणास विनंती करतो की या प्रकाराची सखोल चौकशी करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि ती कारवाई तात्काळ करून सर्व प्रकार थांबवून शांतता निर्माण केली जावी ही विनंती. जिजाऊ ब्रिगेड परतूर शाखेच्या वतिने तहसिलदार यांना निवेदन देऊन निषेध नोंदवला.



# पीएसआय झाल्याबद्दल शीतल वाघमारेंचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, या विद्यालयातील माजी विद्यार्थिनी कु. शितल वाघमारे ही एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन पीएसआय पदी निवड झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य लोकनेते, माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील, विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग सर तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख गुरुकुल प्रमुख ठाकरे एस. पी., प्रा. अतुल पाटील या सर्वांनी विद्यालयाच्या वतीने तिचे अभिनंदन करून सुयश चिंतले.

कुमारी शितल वाघमारे ही अतिशय गरीब हलाखीच्या परिस्थितीतून कोणत्याही प्रकारचा क्लास न लावता मेहनत व जिद्दीने तिने हे यश मिळविले आहे तिने विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे. त्याबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

# मोकाट जनावरांमुळे अपघात वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरात गेल्या कित्येक दिवसापासुन मोकाट जनावरांचा हैदोस वाढला आहे. यामुळे एका तरुण व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला, रामू यादवराव शेटे हा राष्ट्रीय महामार्ग ७५२ वरून बाईक वर जाताना अचानक या रस्त्यावरील मोकाट गाई उधळल्या व या व्यक्तीच्या अंगावर धावून गेल्या या व्यक्तीला गाईंनी चेंगरले यात ते प्राण गमावून बसले, मागच्या आठवड्यात नवीन बस स्थानक समोर गाईंची झुंड या स्थांनकाच्या सुरक्षा जवानांवर धावून गेली यात हे जवान गंभीर जखमी झाले, जेष्ठ नागरिकांना व महिलांना या गाईंच्या झुडीनी मारून जखमी केले, या गाईंचे कळप दिवस-रात्र डेरा टाकून बसलेले असतात, व येणाऱ्या -जाणाऱ्यांना शिंगाने मारतात, हा राष्ट्रीय महामार्ग आहे, त्यामुळे वाहनांची मोठी गर्दी असते, या मोकाट जनावरांचा त्वरित बंदोबस्त व्हावा व हा रस्ता मोकाट जनावर मुक्त करावा अशी नागरिकाची मागणी आहे.





# भोकर तालुका ओला दुष्काळ जाहीर करा

## तहसीलदारांकडे काँग्रेस कमिटीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात मागील तीन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू झाल्याने नदिलगत असलेल्या शेतीत पाणी शिरल्याने खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले तर घराची पडझड झाली आहे. शासनाने याची दखल घेऊन तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शूक्रवारी ( ता. २८ ) करण्यात आली आहे. तहसील विभागास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तालुक्यात प्रारंभी पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी हवालदिल झाला होता.जूलैच्या अतिंम चरणात वरूणराजाने दमदार हजेरी लावल्याने नदीनाले तूडुबं भरले आहेत.तेलगंणा सीमेलगत असलेल्या गावात सुधावागु प्रकल्पातील बॅकवाटरचे पाणी शिरल्याने तारांबळ उडाली आहे. नदीलगतच्या शेतीला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले परिणामी कोवळ्या खरिप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. पिके खरडून गेल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. घराची पडझड झाल्याने संसार उघड्यावर आले आहेत.शासनाने तालुक्यातील नुकसान भागांची त्वरित पाहणी करून तालुक्यात ओला दूष्काळ जाहीर करावा व हेक्टरी ४० हजार रूपये नूकसान भरपाई देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी तालूका काँग्रेस कमेटि, शहर काँग्रेस कमेटि, युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर तालूका अध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, नामदेव आयलवाड, बाळासाहेब पाटील रावणगावकर, गणेश राठोड, आत्रिक पाटील मुंगल बेंबरकर, विठ्ठल पाटील धोंडगे, मिर्झा ताहेर बेग,सूरेश बिल्लेवाड,केशव पाटील पोमनाळकर,सौ.मंगाराणी अंबुलगेकर,अनिता साबळे,सुलोचणाबाई ढोले,मनोज गिमेकर, रामचंद्र मूसळे, श्रीकांत दरबस्तवार, विक्रम क्षिरसागर,मधूकर गोंवदे, संदीप पाटील गौड, उज्वल केसराळे,गंपु पाटील, राजकुमार अंगरवार, अब्दुल खालेद,सुयश पोकलवार यांच्या स्वाक्षरी आहेत.

# कॅम्पस मुलाखतींद्वारे 70 विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील राक्षी येथील कै. सौ. सुनिताताई एकनाथराव ढाकणे पॉलिटेक्नीक कॉलेज, शेवगाव या तंत्रनिकेतन आणि समर्थ प्रायव्हेट आय. टी. आय यांच्या संयुक्त विद्यमाने ढाकणे शैक्षणिक संकुलामध्ये आज( दि.२८ ) रोजी कॅम्पस मुलाखतींद्वारे ७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या कॅम्पसमध्ये टाटा मोटर्स, धूत ट्रान्समिशन, विकास ग्रुप, स्पेस ऑटोपार्टस, क्वेस कॉर्पोरेशन लिमिटेड या अग्रमानांकित कंपनीमध्ये नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. यामध्ये ढाकणे पॉलिटेक्निकचे ४४ विद्यार्थी, समर्थ आयटीआयचे २६ विद्यार्थी अशा ७० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. गुणवत्तापूर्वक आणि विद्यार्थीभिमुख शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांना कोर्स पूर्ण होण्यापूर्वीच नेमणूक पत्र मिळाले असून ग्रामीण भागातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी ढाकणे पॉलिटेक्नीक रोजगार निर्मिती केंद्र म्हणून निर्माण झाले असल्याची माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. श्रीकांत ढाकणे यांनी दिली आहे. विद्यार्थीभिमुख विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळून त्यांचा आत्मविश्वास दुणावला असून बदलत्या कालानुरूप स्वतःला सिद्ध करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये आली आहे विद्यार्थ्यांना मिळालेली नोकरीची संधी हे त्याचेच परीपाक असल्याचे प्राचार्य डॉ. आर.एच अत्तार म्हणाले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. एकनाथरावजी ढाकणे, सचिव श्रीमती जया राहणे, समन्वयक ऋषिकेश ढाकणे, प्राचार्य डॉ. आर. एच अत्तार, आयटीआयचे प्राचार्य संतोष आंधळे, ट्रेनिंग अ‍ॅड प्प्लेसमेंट ऑफिसर प्रा. महेश मरकड, अकॅडेमिक कॉर्डीनेटर प्रा. सुनिल औताडे, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा.राज गुजर, सिव्हील विभागप्रमुख प्रा. इर्शाद पठाण आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# सोयगावात विद्युत पोल वाकला, हँडपंप नादुरुस्त

## शहर अध्यक्ष रवी काळे यांनी दिला निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** शहराला पाणीपुरवठा कमी प्रमाणात असल्याने सोयगाव शहराच्या विविध भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. टंचाई निवारणासाठी हॅन्डपंपचा वापर नागरिक करतात परंतु गेल्या एक महिन्यापासून वार्ड क्रमांक पाच मधील हॅन्डपंप बंदच आहे.आणि हॅन्डपंपाच्या आजूबाजूला मोठमोठे काटेरी झाडे झुडपे विळखा घातला आहे.

सोयगाव शहरातील पाणीटंचाई विचारात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रवीभाऊ काळे यांनी निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला आहे.शहर अध्यक्ष यांनी विविध भागातील हॅन्डपंपची पाहणी केली असता नगरपंचायतचे दुरुस्तीकडे दुर्लक्ष असल्याचे निदर्शनास आले. सदर येथील हॅन्डपंप मागील काही महिन्यापासून नादुरुस्त आहे.

स्थानिक नागरिकांनी वार्ड क्रमांक पाच मधील नगरपंचायत कार्यालयाकडे यासंदर्भात तक्रार केली. परंतु त्यानंतरही हॅन्डपंप दुरुस्त



केला नाही.तसेच महावितरण विद्युत कंपनीचा पोल पूर्ण पणे खाली वाकला आहे. एकतर सध्या पावसाचे दिवस आहे. विद्युत पोल पूर्ण पणे वाकलेल्या अवस्थेत असल्याने तो कधीही हवेने कोणाचाही अंगावर पडू शकतो यामुळे जीवतहाणी किंवा प्राण हानी होऊ शकते याकडे महावितरण कंपनीचे कर्मचारी व नगरपंचायतचे कर्मचारी कोणी पण पाहयाला तयार नाही शेवटी शहर अध्यक्ष रवी भाऊ काळे यांनी पाहणी केली असता नादुरुस्त हॅन्डपंपकडे नगरपंचायतचे दुर्लक्ष असल्याचे निदर्शनास आले. एक ते दीड महिन्यांपासून अशा खराब परिस्थितीत पडला आहे. त्याच्या आजूबाजूला झाडेझुडपे व कचरा साचण्यासोबतच तणकटही वाढले आहे.या हातपंपाजवळ झाडा झुडपे यांची ऐवढी अडचण आहे की नागरिकांना हातपंप दिसत नाही दुरुस्ती करून झाल्यावर पाणी भरायचे कशे अशा प्रश्न नागरिकांना निर्माण झाला आहे. याचा उपयोग नसल्याचे नागरिकांनी शहर अध्यक्ष रवी भाऊ काळे यानां सांगितले.

# विहिरीत आढळला विवाहितेचा मृतदेह

## छळास कंटाळून आत्महत्या केल्याची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** सासरच्या छळास कंटाळून विवाहितेने



आत्महत्या केल्याची घटना निफाड तालुक्यातील भरवस येथे घडली. वैष्णवी किरण वावधाने ( वय २१ ) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. या प्रकरणी लासलगाव पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर वृत्त असे की, मयत वैष्णवी हिचे किरण प्रभाकर वावधाने यांच्याशी दि. ८ मे २०२० मध्ये लग्न झाले होते. लग्नानंतर काही महिने सुरळीत गेले. त्यानंतर मात्र सासरच्या मंडळींकडून वैष्णवी हिस शारीरिक आणि मानसिक त्रास देण्यास सुरुवात झाली.

लग्नात भांडे दिले नाहीत तर कधी स्वयंपाक करता येत नाही यावरून तिला सतत त्रास दिला जात असे. गरोदरपणात गोठ्यात कामास लावणे, जड काम करण्यास भाग पाडले जात होते. डोहाळे जेवण घाला या मागणीवरून नवऱ्याने तिला हाताने, चापटीने मारहाण केली व शिवीगाळ केली. याबाबत तिने वडिलांना देखील सांगितले होते. परंतु अपत्य प्राप्तीनंतर सर्व सुरळीत होईल अशी समजूत तिच्या आई वडिलांनी घातली. अपत्य प्राप्तीनंतर देखील त्रास कमी न झाल्याने वैष्णवी ही सहा महिने माहेरी होती. वैष्णवीचे मामे सासरे कैलास कुयटे रा.दावचवडी यांनी मध्यस्थी करत जबाबदारी घेतल्याने वैष्णवीला सासरी पाठविले. नंतर त्याचे वाटप होऊन चुली वेगळ्या करण्यात आल्या, मात्र शेती एकत्र असल्याने वाद होतच होते.

वेळोवेळी शारीरिक व मानसिक छळ करून शिवीगाळ, मारहाण करत होते. त्यामुळे तीने सदर जाचाला कंटाळून माधव गणपत मानकर यांचे शेत गट नंबर ३९ मधील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली अशी वैष्णवीचे वडील भारत रामनाथ बोचरे रा.देवगाव यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती किरण प्रभाकर वावधाने, सासू जनाबाई प्रभाकर वावधाने, सासरा प्रभाकर गणपत वावधने, दिर सुनील प्रभाकर वावधाने, जाव प्रतीक्षा सुनील वावधाने या सासरच्या मंडळींविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ ( अ ), ३०६, ३२३, ५०४,५०६, ३४ या कलमान्वये लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो. नि.राहुल वाघ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मारुती सुरासे अधिक तपास करत आहेत.

# पुरुषोत्तम मासनिमित्ताने गंगापूजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** श्रावण अदिक मास मंगळवार ( ता.१८ ) पासून सुरू झाला असून विविध धार्मिक परंपरासोबत मातृपूजन, जावयांचा सन्मान, दान, व्रताचे पर्व सुरु होत आहे. घरोघरी पुरुषोत्तम मासाची तयारी झाली आहे. या पवित्र महिन्याचे स्वागत करण्याला सगळेजण सज्ज झाले आहेत.।यावर्षी अदिक श्रावण आला आहे. त्याला पुरुषोत्तम मास देखील म्हटले जाते. हा नियमित महिन्याच्या सोबत अधिकचा असल्याने त्याला अदिक मास म्हटले जाते.

अदिक महिन्यांत दशमी, एकादशी, द्वादशी, पौर्णिमा ह्या विशेष तिथींना दान देण्याचं अधिक महत्त्व आहे. तसेच पंचपर्व म्हणजेच वैधृती योग, व्यतिपात योग, अमावस्या, पौर्णिमा, द्वादशी तिथी ही पंचपर्व आहेत या दिवशी



दाने दिली जातात. अदिक मासांत गंगास्नानाचंही तितकंच महत्त्व आहे. अनेकजण संपूर्ण महिनाभर गंगास्नान करतात. पैठण येथे गंगा पूजन व चुनरी मनोरथ ( गंगेला साडी ओढन्याचा ) चा कार्यक्रम माहेश्वरी महिलांच्या वतीने घेण्यात आला. पैठण येथील माहेश्वरी समाजाच्या मिनाक्षी लोहिया, दीपा राठी, तृप्ती मानधने,सौ.सोनल पारिक या महिलांनी एकत्र येऊन समाजाच्या एकूण 60 महिलांचा गृप करून हा चुनरी मनोरथ व गंगा पूजन कार्यक्रम आयोजित केला होता. एक आगळा वेगळा कार्यक्रम गोदावरी नदीच्या काठावर आज घेण्यात आला.अदिक महिन्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे खूप धार्मिक महत्व आहे.

सर्व प्रथम नाथ मंदिर येथे साडिंच्या रोलचे विधिवत पूजन मनोज देवा शुक्ल यांच्या हस्ते करण्यात आले तदनंतर संकल्प सोडून गंगेची ओटी भरून ,नावपूजन करून गंगा चुनरी पूजन करण्यात आले.या प्रसंगी सर्व 60 महिला उपस्थित होत्या.



# नागपूर ते पूणे रेल्वे वाढवा : खा. तडस

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** बुलढाणा अपघाताच्या पार्श्वभूमीवर नागपूर ते पूणे रेल्वे गाड्यांच्या संख्येत वाढ करण्याची मागणी खासदार रामदास तडस यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटून केली आहे. दिल्ली येथे झालेल्या या भेटीत तडस यांनी बुलढाणा जिल्ह्यात समृध्दी महामार्गावर झालेल्या अपघाताची माहिती रेल्वेमंत्र्यांना दिली. गाड्या कमी व प्रवासी भरपूर असे झाल्याने नागरिक वाहनाने पूणे गाठतात. ज्या गाड्या आहेत त्याचे आरक्षण मिळत नाही. म्हणून या मार्गावर गाड्यांची संख्या वाढवावी, सुपरफास्ट गाड्यांचा वर्धा व बडनेरा येथे थांबा द्यावा, असे तडस यांनी सुचविले.



वर्धा भुसावळ या पॅसेंजर या गाडीला एक्सप्रेस गाडीचा दर्जा देण्यात आल्याने ही गाडी आता कवठा, तळणी, दिपोरी, मालखेड, टिमटाला या स्थानकांवर थांबत नाही. त्यामुळे प्रवासांची गैरसोय होत आहे. तसेच नागपूर अमरावती, नागपूर काजीपेठ, बल्लारशाह भुसावळ या पॅसेंजर गाड्या सर्व थांब्यांसह पूर्ववत सुरू कराव्या. अश्याही मागण्या खा.तडस यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केल्या. त्यावर रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे तडस यांनी सांगितले.

# महिला स्वयंसाहाय्यता गटांना दुपटीने अर्थसाहाय्य

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**बँक कर्जाची नियमित परतफेड :** मुख्यमंत्री आपल्या निवेदनात म्हणाले की, उमेद अभियानांतर्गत आतापर्यत सुमारे ६ लाख स्वयं सहाय्यता समूह स्थापित करण्यात आले असून यामध्ये ६० लाखांपेक्षा अधिक महिलांचा समावेश आहे . तसेच ३० हजार ८५४ ग्रामसंघ व १ हजार ७८८ प्रभागसंघ आहेत . या महिलांना उत्पन्न मिळावे म्हणून उमेद अभियान तसेच बँकामार्फत अर्थसहाय्य देण्यात येते . स्वयं सहाय्यता गट स्थापन झाल्यानंतर ३ महिन्यानंतर त्यांना अंतर्गत कर्ज व्यवहाराला अर्थसहाय्य म्हणून रु .१० हजार ते रु १५ हजार याप्रमाणे फिरता निधी वितरीत करण्यात येतो .



**मुंबई :** उमेद अभियानातील महिलांच्या स्वयं सहाय्यता गटांना देण्यात येणाऱ्या फिरत्या निधीत दुपटीने वाढ करून ३० हजार रुपये निधी प्रत्येक गटांना देण्याचा तसेच कर्मचारी व चळवळीतील संसाधन व्यक्तींना देखील मानधनात भरीव वाढ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात निवेदन केले. महिलांची देशाच्या विकासात महत्वाची भूमिका आहे. आपल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणतात की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयं सहाय्यता गटांना प्रती गट रु 15 हजार फ़िरता निधी देण्यात येतो. त्यामध्ये वाढ करुन प्रती समुह रु 30 हजार फ़िरता निधी देण्यात येईल. या वाढीमुळे अतिरिक्त रु 913 कोटी एवढ्या निधीची तरतुद राज्य शासनामार्फ़त करण्यात येणार आहे.

स्वयं सहाय्यता गटांना दैनंदिन मार्गदर्शन करण्यासाठी गावपातळीवर एकूण ४६ हजार ९५६ समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) कार्यरत आहेत. त्यांना सर्वसाधारणपणे दरमहा रु ३ हजार एवढे मानधन अदा करण्यात येते. बचत गट चळवळीतील त्यांचे योगदान व मागणी लक्षात घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करून ते प्रति महा ६ हजार रुपये एवढे करण्यात येणार आहे. या करिता १६३ कोटी रुपये एवढ्या अतिरिक्त निधीची तरतुद करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. या अभियानात राज्यस्तरापासून ते क्लस्टर स्तरापर्यत स्वतंत्र, समर्पित व संवेदनशील यंत्रणा तयार करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत अभियानांतर्गत एकूण २७४१ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या मासिक मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यात येणार आहे तसेच त्यांच्या इतरही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.
स्वयं सहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुचे मूल्यवर्धन करणे ,गुणवत्तेत वाढ करणे , आधुनिक पॅकेजिंग व ब्रॅन्डींग करिता प्रोत्साहन देणे व उत्पादनांना हक्काची बाजारेपठ मिळवून देणे इत्यादी उपक्रम राबवून ग्रामीण महिलांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करण्यासाठी शासन भविष्यात देखील कटीबध्द असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश देखील महिला स्वयं सहायता गटांमार्फत देण्यात येतील असे मुख्यमंत्री म्हणाले.

आतापर्यत ३ लाख ९१ हजार ४७६ गटांना रु. ५८४ कोटीचा फिरता निधी देण्यात आला आहे. तसेच आतापर्यंत ८० हजार ३४८ समूहांना रु.५७७ कोटीचा समुदाय गुंतवणूक निधी देण्यात आला आहे. आतापर्यत बॅकामार्फ़त राज्यातील ४.७५ लाख स्वयं सहाय्यता गटांना रु. १९ हजार ७७१ कोटीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यामध्ये २०२२-२३ या एकाच वर्षात २ लाख ३८ हजार ३६८ स्वयं सहाय्यता गटांना तब्बल रु. ५ हजार ८६० कोटीचे बँक कर्ज देण्यात आले आहे. अभियानाअंतर्गत ९६% बँक कर्जाची परतफेड वेळेवर होत असून सध्यस्थितीत NPA चे प्रमाण फ़क्त ४.३१% आहे त्यामुळे स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज देण्यामध्ये बँका पुढे येत असून या गटातील महिलांना पतपुरवठा करण्यासाठी बॅका मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत आहेत.

# देवळगाव गुजरी येथे प्रवासी निवारा नसल्याने हाल

## महामार्गावर नवीन प्रवासी निवारा बांधावा : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील देवळगाव गुजरी येथे राष्ट्रीय महामार्गावर प्रवासी निवारा नसल्याने प्रवाशांचे होता आहे हाल

मराठवाडा, खान्देश, विदर्भाला जोडणाऱ्या वाघजाळ फाटा-जळगाव या राष्ट्रीय महामार्गावरील देवळगाव गुजरी बसस्थानकावर प्रवासी निवारा नसल्याने येथील प्रवाशांना उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अगोदर प्रवासी निवारा होता तर व्यापारी वर्गाने अतिक्रमण केले आहे आणि तो काहीच कामाचा पण नाही.कारण रस्ता आता बायपास झाला आहे.प्रशासनाने आता नवीन प्रवासी निवारा उभारण्यात यावा, अशी मागणी प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांतून होत आहे.
गेल्या दोन वर्षांपूर्वी या जामनेर ते धामणगांव बढे या राष्ट्रीय महामार्गाचे दुपदरीकरण झाले. तेव्हा बस स्थानकापासून दूरवर एक छोटासा टिन पत्राचा प्रवासी निवारा बनविला आहे. परंतू, तेथे बस थांबत नसल्यामुळे प्रवाशी व विद्यार्थी जात नाही.५ हजार लोक वस्तीच्या या देवळगांव गुजरी गावातून व परिसरातील सावळदबारा, नांदा तांडा,डाभा,देव्हारी, टिटवी,मोलखेडा,कापूसवाडी,चारुतांडा, टिटवीसह विविध बारा गावांतील प्रवाशी याच ठिकाणाहून ये-जा करीत असतात.
विशेष म्हणजे देवळगांव गुजरी हे बाजार पेठेचे गाव आहे. तसेच गावातील प्रवासी व्यापारी, विद्यार्थी , शेतकरी रोज बुलडाणा, जळगाव, औरंगाबाद,अकोला, नागपूर, मुंबई, धुळे, चाळीसगाव, भुसावळ, सिल्लोड, भोकरदन येथे दररोज व्यापारासाठी व शेतीमाल विक्रीसाठी व विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी ये जा करीत असतात. तसेच येथून जवळच असलेल्या अजिंठा लेणी, गजानन महाराज चे शेगाव, लोणार सरोवरसाठी ही पर्यटक व जवळच असलेल्या श्री चक्रधर स्वामींच्या दर्शनासाठी जाळीचा देव व सावळदबारा येथे भाविक येथूनच ये जा करण्याकरीता प्रवाशांची वर्दळ असते. परंतू, या ठिकाणी प्रवाशी शेड नसल्यामुळे प्रवाशांना हॉटेल समोर थांबून बसची प्रतिक्षा करावी लागते. अनेकदा भरधाव वेगातील वाहणांची धडक बसण्याची भिती निर्माण होते.

फाट्यांवरही निवारा नाही नवीन उभारण्यात यावा

जामनेर मार्गावर सोयगाव तालुक्यातील सावळदबारा,देव्हारी, धामणगाव बढे,जामठी चारही गावाच्या स्थानकावर येथूनच बस जाऊन उभी राहते.या सर्व डेपोच्या बसेस देवळगाव गुजरी हून येतात आणि प्रवाशी निवारा नसल्याने या ठिकाणी विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत आहे. आजूबाजूला घाणीचे साम्राज्य पसरले आहे.मोठमोठे उकिरडेचे ढिग झाले आहे याकडे ग्रामपंचायत ने लक्ष दिले पाहिजेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून सुसज्ज प्रवासी निवारा व स्वच्छतागृह उभारावे,अशी मागणी प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व प्रवासी, विद्यार्थी यांनी केली आहे

# शेतकऱ्यांनी एक रुपया भरून विमा योजनेत सहभागी व्हावे

## तहसीलदार मोहनलाल हरणे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात चालू खरीप हंगामापासून राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोफत स्वरूपात असलेली प्रती अर्ज केवळ एक रुपयात भरून मिळेल. पिक विमा भरण्याची योजना राज्यातील सरकारने सुरू केली. या मोफत स्वरूपात असलेल्या आयोजनेत सहभागी होण्याची प्रधानमंत्री पिक विमा पोर्टलवर नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोयगाव तहशीलचे तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधारकार्ड, पिक पेरा अहवाल मोबाईल क्रमांक, सातबारा ८ अ व बँक पासबुक अशा कागदपत्राची आवश्यकता लागणार आहे. या योजनेचा पुढील बाबींचा समावेश करण्यात आला आहे. आवाहन घटकाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान हवामानातील बदल एकूण परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान नैसर्गिक गारपीट, वादळ, चक्रीवादळ व क्षेत्र जलमय होणे भूस्खलन दुष्काळ पावसातील खंडकिंड व रोग यादी बाबीमुळे होणारे नुकसान हंगामाच्या शेवटी येणारे घटक स्थानिक नैसर्गिक कारणामुळे पिकाचे नुकसान केले आहे. काढणीपच्छातः १४ दिवसा पर्यंत नुकसान या बाबीचा समावेश आहे. या योजनेतील समाविष्ट पिके सध्या अपन्या याप्रमाणे आहेत पिक वर्गवारी पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मुग व उडीद यासारख्या पिकांची तणधान, कडधान्य व अन्य पिकाचे शेतकऱ्यांनी चिमा भरण्यासाठी शेवटच्या तारखेपर्यंत वाट न पाहता लवकरात लवकर पिक विमा भरावा. शेवटच्या तारखेला विमा भरण्यासाठी संकेतस्थळावर ताण येऊन चालत नाही. अशा कारणामुळे शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.आता फक्त तीन दिवस शिल्लक राहिले आहे त्याकरिता शेतकऱ्यांनी त्वरित विमा भरावा असे आवाहन तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे.

# रिक्षाचालकाचा असाही प्रामाणिकपणा

## रस्त्यात सापडलेले १० हजार रुपये केले परत



आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरातील मुख्य रस्त्यावरून रिक्षा चालवत असतांना रस्त्यात सापडलेले १० हजार रुपये रिक्षा चालकाने प्रामाणिकपणा दाखवत पोलिसांच्या स्वाधीन केले आहेत. शहरातील गाव भागातील रहिवाशी असणारे एकनाथ मोहनराव थोटे हे रिक्षा चालक रेल्वे स्टेशनपासून गाव भागाच्या दिशेने येत असताना मुख्य रस्त्यावरील सांगली बँकेच्या समोर रस्त्यात दहा हजार रुपये त्यांना पडलेले आढळून आले. थोटे यांनी रिक्षा थांबवून सदरील पैसे थेट पोलिस स्टेशन गाठून पत्रकार अशोक साकळकर आशिष गारकर यांच्या समक्ष पोलीस निरीक्षक एम. टी.सुरवसे यांच्याकडे सुपूर्द केले. सांगली बँकेसमोर दहा हजार रुपये सापडले असून सदरील पैसे ज्यांचे असतील त्यांनी ओळख पटवून घेऊन जाण्याचे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले होते. समाज माध्यमांवर पोस्ट टाकल्यानंतर सदरील पैसे मोंढा भागातील कापड दुकानावर काम करणाऱ्या पवन गोरे या कामगाराचे असल्याचे निष्पन्न झाले. पवन गोरे यांच्या खिशातून सदरील रक्कम पडल्याचे सिध्द झाल्यानंतर पोलिसांच्या समक्ष सदरील रक्कम मूळ मालकाला सुपूर्द करण्यात आली. कुठल्याही अमिषाला बळी न पडता रिक्षाचालक एकनाथ थोटे यांनी रस्त्यात सापडलेली दहा हजारांची रक्कम प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन केल्या बद्दल पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे, सहायक पोलीस सचिन पुंडगे यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अशोक साकळकर, आशिष गारकर, गोविंद मुंदडा ,पोलीस कर्मचारी भागवत खाडे, किरण चव्हाण, विष्णू धोत्रे ,नितीन बोंडारे, विकास जाधव दीपक आढे, एका दिवसाची ५०० रुपये कमाई असणाऱ्या रिक्षा चालकाने दाखविलेल्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



# लासलगाव रेल्वे स्थानकाचे लवकरच रुपडे पालटणार

## स्वातंत्र्यदिनी व्ही.सी.द्वारे मोदींच्या हस्ते उद्घाटन



आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव रेल्वे स्थानकाचे रुपडे पालटणार असून येत्या दि. १५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उदघाटन करणार आहेत.

रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण व्हावे यासाठी रेल्वे बोर्डाने अमृत भारत स्टेशन योजना आणली आहे. त्यायोजनेअंतर्गत लासलगाव रेल्वे स्थानकाचा समावेश झाल्याने भुसावळ विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इती पांडेय यांनी दौरा करून रेल्वे स्थानकाची पाहणी केली. येत्या काही दिवसात या रेल्वे स्थानकात सर्व प्रकारच्या सोयी - सुविधा निर्मिती करण्याच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ होणार आहे. यामध्ये नविन बुकिंग ऑफिस, स्थानक परिसराचे सुशोभीकरण, न्यू फूट ओव्हर ब्रीज लिफ्ट सह, प्लॅटफॉर्म कोच इंडिकेटर, इलेक्ट्रॉनिक बोर्ड डिस्प्ले, स्थानक प्रवेशद्वारांचा विकास, व्हीआयपी प्रतीक्षागृहांची उभारणी अंतर्गत रचनेत सुधारणा, स्वच्छतागृहांमध्ये सुधारणा, कांदा लोडिंग कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. स्थानकाचे रूप पूर्णतः बदलणार असल्याने शहराच्या आर्थिक भरभराटीस चालना मिळणार आहे. यासाठी मा.जि.प.सदस्य ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप यांनी वेळोवेळी केंद्रीय आरोग्यराज्यमंत्री डॉ.भारतीताई पवार व रेल्वेच्या भुसावळ विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक इती पांडेय यांच्याकडे पाठपुरावा केला होता. ईती पांडेय यांचा लासलगाव येथे बाजार समितीच्या मा.सभापती सुवर्णा जगताप तसेच प्रवासी संघटना, प्रवासी, नागरिक यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कोरोना काळात रद्द झालेल्या देवगिरी एक्सप्रेस, जनता एक्सप्रेस, शालीमार या गाड्या चालू कराव्यात, पठाणकोट अमृतसर एक्सप्रेसला थांबा मिळावा, कुर्ला एक्सप्रेस मनमाड पासून पूर्ववत चालू करावी, कांदा लोडिंगसाठी कॉंक्रिटीकरण करावे आदी मागण्या करण्यात आल्या. याप्रसंगी प्रकाश दायमा, ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप, राजाभाऊ चाफेकर, नितीन शर्मा, निलेश सालकाडे, गणेश डोमाडे, बापू लचके, बबन शिंदे, सरपंच शितल शिंदे, सुनील नेवगे, ज्ञानेश्वर शिंदे, सुनील शिंदे, मनोहर खिलवाणी, भाऊसाहेब वाघ, गोपीनाथ उगले, भगवान बोराडे, राजू शेख, शैलजा भावसार, भारती महाले, योगिता आंबेकर, सोनाली शिंदे, ऐश्वर्या जगताप आदी उपस्थित होते.



# चिश्तिया महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणाविषयी कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** नवीन शैक्षणिक धोरण 2020 या विषयावर चिश्तिया महाविद्यालय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ प्रो. डॉ. यांनी सहचित्र ( पीपीटी ) द्वारे दोन तास नवीन शैक्षणिक धोरण आणि भारताचा शैक्षणिक विकास यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टिकोनातून कौशल्य विकसित होऊन रोजगारभिमुक शिक्षण व्यवस्था कशी निर्माण करता येईल. वेगवेगळ्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्य सकारात्मक दृष्टिकोनातून विकास करता येईल.याविषयी त्यांनी आपले मत स्पष्ट करून भविष्यकाळात विद्यार्थ्यांना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. या संदर्भात मुद्देसूद मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षकांमध्ये जाणीव निर्माण केली.नवीन शैक्षणिक धोरणामध्ये गुणात्मकता, विकासात्मकता आणि रोजगारभिमुक कौशल्य यांचा विस्ताराने संदर्भसह महत्व स्पष्ट केले. आणि नवीन शैक्षणिक धोरणात आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनात किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले. यावेळी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय संचालक डॉ रमेश शेकोकार यांनी मुक्त विद्यापीठाची शैक्षणिक भूमिका स्पष्ट केले. याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ हरी जमाले यांनी आपल्या भाषणातून नवीन शैक्षणिक धोरणाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा उर्दू एज्युकेशन संस्थेचे सदस्य यांनीअध्यक्ष समारोप करताना नवीन शैक्षणिक धोरणात विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे भविष्यासाठी किती महत्त्वाचे आहे. यासंबंधी विचार स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्र प्राचार्य डॉ अर्शिया कादरी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल प्रास्ताविक केले. याप्रसंगी सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांचे सत्कार अभ्यास केंद्र समन्वयक डॉक्टर गणी पटेल प्रा सुनील जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सुनील जाधव व आभार डॉ गणी पटेल सर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी अबू मोहम्मद , प्रा पवार सर , प्राचार्य अतहर सर , प्रा अफरोजा, प्रा देशपांडे तसेच नेमत कॉलेज , बुऱ्हानी कॉलेज, चिश्तिया महाविद्यालय आदी शैक्षणिक संस्थेचे शिक्षक, प्राध्यापक विद्यार्थी बहुसंख्य आणि उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा रहेमत सर , प्रा शेख अफसर, प्रा शेख जुबेर, प्रा जैदी सैफ, प्रा शेख समरिन , प्रा नुरूनिस्सा, शेख जाहीर आदींनी परिश्रम घेतले.

# शेतात आढळला ११ फूट लांब अजगर

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** पावसाचे पाणी विविध भागांमध्ये साचल्याने साप आढळण्याचे प्रमाण वाढले आहे. जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील एका शेतातील झाडावर तब्बल ११ फूट लांब अजगर आढळून आला, तर शहरातील गंगा नगर भागात एका घरात चक्क सात साप दिसून आले. दोन्ही वेगवेगळ्या घटनेत सर्पमित्रांनी त्यांना पकडत जंगलात सोडून देत जीवदान दिले.

पातूर तालुक्यातील बाभुळगाव येथील शेत मालक विठ्ठल गावंडे यांच्या शेतातील झाडावर ११ फूट लांब अजगर बसला होता. तो दिसून आल्यावर अनेकांची भंबेरी उडाली. अकोला येथून सर्पमित्र सुजित देशमुख, सुरज इंगळे यांना पाचारण करण्यात आले. सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने अजगराला पकडून पातूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समक्ष त्या अजगराला वन क्षेत्रात सोडण्यात आले. दुसऱ्या घटनेत गंगा नगर भागात पुरवावर यांच्या घरात अनेक साप असल्याचे आढळून आले. पुरवावर यांनी तातडीने सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. त्यांनी तात्काळ धाव घेतली.



एक-एक सापाला पकडून बरणीत टाकले. हे सर्व साप नानेटी जातीचे असून, ते बिनविषारी व निरुपद्रवी असल्याचे बाळ काळणे यांनी सांगितले. नानेटी जातीचे साप समुहाने राहतात. या सापांपैकी एखाद्याला मारले तरी त्याची भावंड त्या ठिकाणी दिसून येतात. त्यामुळे साप प्रतिशोध घेण्यासाठी आल्याचा गैरसमज लोकांमध्ये वाढतो. हे साप बिनविषारी असतात, असे बाळ काळणे म्हणाले.




# मार्केटला आग, लाखोंचे नुकसान


आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** येथील स्वर्गीय अब्दुल हबीब कुरेशी मटन मार्केटमध्ये आज, बुधवारी अचानक लागलेल्या आगीने खळबळ उडाली. संध्याकाळी साडेचार वाजताच्या सुमारास आठवडी बाजारात लागलेल्या आगीत लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. नगरपरिषदेचे अग्निशामक दल तत्काळ आल्याने आग लवकर नियंत्रणात आली.

मेहकरच्या आठवडी बाजारमध्ये नगरपरिषदेचे स्वर्गीय अब्दुल हबीब कुरैशी मटन मार्केट असून ते जीर्ण झाल्याने बंद अवस्थेत आहे. बाजूलाच शेख कल्लू शेख इब्राहिम यांची भंगारची दुकान असून त्यांनी विकत घेतलेला सर्व भंगार मार्केटमध्ये ठेवला होता. सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानकपणे आग लागल्याने सर्वत्र धूर पसरला. नागरिकानी आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले असतानाच अग्निशमनदल दाखल झाले. यामुळे आग आटोक्यात आली. आगीत प्लास्टिकच्या वस्तू, वाहनाचे टायर व खाली पाणी बॉटल जळून खाक झाले. तीन लाखांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. पोलीस निरीक्षक शिंगटे, पालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# शालिकराम बावणे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** डाभा येथील शालिकराम संपत बावणे ( वय ८१ ) वर्ष यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, चार मुली,सुना,जावई,नातु,नातंवड असा मोठा परिवार आहे त्यांच्यावर दि.२६/७/२३ रोजी बुधवारी सकाळी अकरा वाजता मोक्षधाम स्मशानभुमीत अंतिम अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी बुलढाणा, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जामनेर, फत्तेपूर व सावळदबारासह नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते. गणेश बावणे यांचे ते वडील होत.



# अमरावती येथे 'कविता पावसाच्या' काव्यमहोत्सव थाटात

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** संवेदना बहुउद्धेशीय संस्था अमरावती, सृजन साहित्य संघ, अमरावती व मराठी कट्ट्यातर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा राज्यस्तरीय काव्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते 'कविता पावसाच्या ' या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव दिनांक 23.07.2023 ला रविवारी सकाळी 11वाजता कांचन रिसोर्ट,रिंग रोड,नवसारी जवळ,अमरावती येथे थाटात पार पडला. त्याप्रसंगी काव्यमहोत्सवाचे व सृजन साहित्य संघ शाखा अमरावती कार्यकारिणीचेही उदघाटन मा. शिवमती कांचनताई उल्हे यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ शामसुंदर निकम, तर प्रमुख पाहुणे दीपकजी दारव्हेकर व अभियंता वा.पा.जाधव, आबासाहेब कडू व संजीवनी ताई काळे व सृजन साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री रवींद्रजी जवादे व संवेदनां संस्थेचे अध्यक्ष गजानन काकडे हे उपस्थित होते. तर याचं मंगल प्रसंगी मराठी कट्टा,परिवर्तन प्रबोधिनीच्या अध्यक्ष प्राचार्य शोभाताई रोकडे यांच्या वाढदिवसाचा शुभेच्छा कार्यक्रम सुद्धा साजरा करण्यात आला.त्यानंतर काव्यस्पर्धेसाठी आलेल्या कवितेतून सर्वोत्कृष्ट तीन कवितेला पुरस्कार प्रदान करण्यात आले त्यामध्ये प्रथम प्रा.जयश्री कोटगीरवार वर्धा, तर द्वितीय गणेश खडके दर्यापूर, तृतीय प्रा.वर्षा कावरे, मूर्तिजापूर यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रंथपूजनाने काव्यमहोत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर सर्व मानवराचे मनोगतपर भाषण झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता राऊत यांनी केले तर, प्रास्ताविक भाषण विशाल मोहोड यांनी केले तर प्रा.शोभाताईंना दिलेल्या शुभेच्छा पत्राचं वाचन संदिप देशमूख यांनी केलं तर, कांचनताई यांनी लिहिलेला शिव पोवाडा गजानन काकडे यांनी गाऊन संपूर्ण कार्यक्रमात उत्साह निर्माण केला या राज्यस्तरीय काव्यमहोत्सवाचं सूत्रसंचालन खुशाल गुल्हाने यांनी केलं.निमंत्रित सर्व कवींनी पावसावरील आपल्या कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. शेवटी आभार प्रदर्शन अजय अडीकणे यांनी करून या काव्यमहोत्सवाचा सुंदर समारोप केला.





# वंचित बहुजन आघाडीने केले पीडित कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव जा :** २७ जुलै रोजी जळगाव जामोद येथिल वंचित बहुजन आघाडी चे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पुरग्रस्त पीडितांना एक हात मदतीचा म्हणून मानवतचे दर्शन करून एक छोटासा प्रयत्न केला.

जळगाव शहरातील जे पिडित, बेघर कुटुंब आहेत त्यांना जिवणाश्यक वस्तुमध्ये गहुआटा,तेल, साखर, चहा पावडर,मिरची पावडर,माचिस,हळद,मुंग दाळ,मसाला,नमक थैली,सह सह साडी अशाप्रकारे काही पीडितांना पक्ष कार्यालयात व नंतर घरपोच जाऊन किटचे वाटप करण्यात आले यावेळी वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा संघटक अरुणभाऊ पारवे, जिल्हा अध्यक्षा विशाखाताई सावंग, माजी तालुका अध्यक्ष रतनभाऊ नाईक, महिला नेत्या पार्वताबाई इंगळे,जेष्ठ कार्यकर्ते नारायण पारवे, तालुका उपाध्यक्ष सुनिल बोदडे,माजी तालुका अध्यक्षा वंदनाताई भगत, क्रुषि उत्पन्न बाजार समिती संचालक प्रशांत अवसरमोल, जिल्हा सदस्या मंगलाताई विजय पारवे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष जगदीश हातेकर, शहर अध्यक्ष आजम कुरेशी,माजी तालुकाध्यक्ष अध्यक्ष एस. डि. झनकेसर , महिला तालुका अध्यक्षा सुनिता हेलोडे, संतोष तिजारे , राहुल तायडे,विजय तायडे, ज्ञानेश्वर कोकाटे आनंदा गवई, संतोष पवार,मनोज अंदुरकार,अमोल तायडे, बुद्धभूषण अरदळे, नितिन वानखडे,राजु तायडे,सह वंचित बहुजन आघाडी चे कार्यकर्ते व भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते उपस्थित होते व यानंतर जे पिडित कुटुंब असतील त्यांनाहि वंचित बहुजन आघाडी चे पदाधिकारी सर्वोतोपरी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.

# 'पीएम किसान' सन्मान की उपेक्षा ?

## वाशिम जिल्ह्यातील हजारो शेतकरी लाभापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** दर चार महिन्यांनी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट दोन हजार रुपये असे वर्षाचे एकूण सहा हजार रुपये जमा होणाऱ्या ' पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या ' लाभापासून वाशिम जिल्ह्यातील मालेगाव, रिसोड, मंगरूळपीर, कारंजा, मानोरा व वाशिम तालुक्यातील हजारो शेतकरी वंचित आहेत. मागील दोन तीन वर्षे मिळणारे दोन हजार रुपये एकाएकी येणे बंद का झाले.. ? या प्रश्नाची विचारणा शेतकरी स्थानिक तहसीलदार कार्यालयात करत आहेत.मात्र तेथे त्यांना तुम्ही ' केवायसी ' केली नाही असे मुखपाठ झालेले साचेबद्ध एकच उत्तर मिळत असल्याची धक्कादायक माहिती अनेक शेतकऱ्यांकडून मिळाली आहे.

केवायसी चा बागुलबुवा पुढे करून वंचित असलेल्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना तुमचीच चूक असल्याचे सांगत संबंधीत प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी अंग झटकत आहेत. सदर योजनेचा लाभ घेणारे बहुतांश शेतकरी हे, ग्रामीण भागातील आहेत. त्यामुळे कित्येक शेतकऱ्यांकडे मोबाईल नाहीत. असे शेतकरी स्थानिक तहसीलदार कार्यालयात केवायसी करण्यासाठी गेले असता, तेथे इंटरनेट नाही, सर्व्हर डाऊन आहे, लॅपटॉप चालू होत नाही. अशी फुटकळ कारणे देऊन त्यांची बोळवण केल्या जाते.पण आपणास दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये म्हणजे वर्षाला एकूण सहा हजार रुपये मिळावेत म्हणून शेतकऱ्यांना स्थानिक तहसील कार्यालय व जिल्हा बँकेचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. परिणामी संबंधित प्रशासनाचा नाकर्तेपणा योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या मुळावर बेतला असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. त्यामुळे सदर योजना शेतकऱ्यांचा सन्मान करणारी आहे की, उपेक्षा.. ? असा संतप्त सवाल वंचित शेतकरी करीत आहेत.

योजनेचा खरा लाभ घेणारे बहुतेक लाभार्थी हे गावपातळीवरील गरीब, अल्पभूधारक, जेष्ठ नागरिक, विधवा महिला आहेत . वर्षभरात सहा हजार रुपये मिळत असल्याने या रकमेचा घर व शेती खर्चासाठी उपयोग होईल या अपेक्षेतून शेतकरी दर चार महिन्याला मोठ्या आतुरतेने हप्त्याची वाट पहात असतात . परंतु मागील अनेक हप्ते पात्र असूनही मिळत नसल्याने वंचित शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे . या गंभीर बाबीची वरिष्ठ स्तरावरून दखल घेणे गरजेचे आहे .

मागील काही दिवसा अगोदर माध्यमातून एक माहिती पुढे



आली होती, की १४ लाख अपात्र शेतकऱ्यांना पात्र ठरवून सदर योजनेचा लाभ मिळाला होता . मला असे म्हणायचे आहे की . . ! जो सातबारा धारक आहे, जो शेती धारण करतो तो शेतकरीच असतो . मग पात्र आणि अपात्र हा भेदभाव कशासाठी . . ? आणि खऱ्या अर्थाने सरकारला जर ही योजना शेतकऱ्यांसाठी तळमळीने राबवायची असेल, तर प्रत्येक शेतकऱ्याची ' केवायसी ' ही सबंधित प्रशासनाने करायला पाहिजे . अन्यथा यापुढेही लाखो शेतकरी या सन्मान योजने पासून वंचितच राहणार आहेत .याची सरकारने दखल घेऊन प्रत्येक तालुक्यातील गावपातळीवर, मग तो ग्रामसेवक असेल, तलाठी असेल अथवा जो कोणी नेमून दिलेला कर्मचारी असेल त्यांच्यामार्फत प्रत्येक सातबारा धारक हयात असलेल्या शेतकऱ्याची केवायसी करून सरसकट शेतकऱ्यांना पात्र ठरवून त्यांची सदर योजनेत नोंद केली पाहिजे . तरच सर्व शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळेल . . !

विष्णुपंत भुतेकर, ( संस्थापक, अध्यक्ष भूमिपुत्र शेतकरी संघटना )

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर